cmyk

## संपादकीय

### सत्यासाठी विरोधकांचे रणशिंग

मुंबईच्या रस्त्यांवर शनिवारी पुन्हा एकदा जनसमुदाय उतरला, घोषणा घुमल्या आणि महाराष्ट्रातील राजकारणात तापमान वाढलं. मतदार यादी घोळाच्या मुद्यावरुन मुंबईत राजकीय वातावरण ढवळून निघालं. महाविकास आघाडी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने एकत्र येत ''सत्याचा मोर्चा'' काढून राज्यातील निवडणूक प्रक्रियेतील अनियमिततेविरोधात तीव्र भूमिका घेतली.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१८७ | मंगळवार दि.४ नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### भारताच्या लेकींनी पटकावले विश्वविजेतेपद

मुंबई : नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर आज रंगलेल्या महिला विश्वचषक स्पर्धेतील अंतिम सामन्यात भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेला पराभूत करीत पहिली वहिली विश्वचषक स्पर्धा जिंकत इतिहास रचला. शफाली वर्मासह दीप्ती शर्माच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर भारतीय संघाने २९९ धावांचा बचाव करीत फायनल बाजी मारली. अर्धशतकी खेळीनंतर दीप्ती शर्माने ५ विकेटचा डाव साधत संघाला ५२ धावांनी विजय मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आणि वर्ल्ड कप जिंकला.
२००५ आणि २०१७ मध्ये अधुरे राहिलेले स्वप्न नवी मुंबईत साकार करून दाखविले.

### डंपरने १९ जणांचा जीव घेतला ३० जखमी

जयपूर: राजस्थानची राजधानी जयपूरमध्ये एक भीषण रस्ते अपघात झाला. मद्यधुंद अवस्थेत एका डंपर चालकानं भरधाव वेगात आधी दुचाकीला धडक दिली. त्यानंतर डंपर सुसाट वेगात पादचाऱ्यांना आणि अन्य वाहनांना चिरडत सुटला. घटनेचं सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आहे. त्यात अनियंत्रित झालेला डंपर रस्त्यावर अनेकांना चिरडताना दिसत आहे. अपघात इतका भयंकर होता की अनेक मृतदेह डंपरच्या खाली अडकले.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या अपघातात आतापर्यंत १९ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ३० जण जखमी झाले आहेत. जखमींना कांवटिया रुग्णालय आणि ट्रॉमा सेंटरमध्ये दाखल करण्यात आलं आहे.

### 'वंदे मातरम' वाद उफाळला; अबू आझमींना सुनावलं

मुंबई: देशामध्ये वंदे मातरम गायनावरुन काही मुस्लिम नेत्यांमुळे सात्यत्याने वाद होत राहीला आहे. राज्य सरकारने अलिकडेच शाळांमध्ये पूर्ण वंदे मातरम गायनाचा आदेश काढला आहे. या निर्णयावरुन पुन्हा एकदा राजकीय वाद पेटलेला पाहायला मिळतो आहे. समाजवादी पक्षनेते अबू आझमी यांनी वंदे मातरम गायनाच्या या आदेशावर टीका केली आहे. त्यावरुन मंत्री मंगलप्रभात लोढांनी आझमींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अी मागणी केली आहे. पाहूयात ते नेमक काय म्हणाले आहेत?अबू आझमींच्या घरासमोर सामुहीक वंदे मातरम होणार आहे'', असा इशारा लोढांनी दिला आहे.

### मराठी माझी आई, उत्तर भारत माझी मावशी

मुंबई;आगामी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मराठी विरुद्ध अमराठी असा वाद पेटला असतानाच आता शिवसेना शिंदे गटाचे आमदार प्रकाश सुर्वे यांनी आता मनसेसह शिवसेना ठाकरे गटाला सुद्धा आयत कोलित दिलं आहे. प्रकाश सुर्वे यांनी एका कार्यक्रमामध्ये बोलताना मराठी माझी आई आहे, तर उत्तर भारत माझी मावशी आहे. आई मेली तरी चालेल, मात्र मावशी मरायला नाही पाहिजे, अशी मुक्ताफळे उधळली आहेत. त्यामुळे एक प्रकारे मराठी विरुद्ध अमराठी वादामध्ये प्रकाश सुर्वे यांनी केलेल्या वक्तव्यावरून वादंग निर्माण होण्याची चिन्ह आहेत.

### पैलवान सिकंदरसोबत पंजाबमध्ये चुकीचं घडलं?


मुंबई: पंजाब पोलिसांनी केलेल्या कारवाईमुळे महाराष्ट्रातील नामवंत पैलवान सिकंदर शेख हा वादात सापडला आहे. राजस्थानमधील कुख्यात पपला गुर्जर टोळीशी संबंध आणि अवैध शस्त्र तस्करी केल्याच्या आरोपावरून पंजाब पोलिसांनी सिकंदरला बेड्या ठोकल्या आहेत. मात्र महाराष्ट्रासह पंजाब, हरियाणा आणि देशभरातील तगड्या पैलवानांना चितपट करत नावलौकिक केलेल्याला अडकवण्यासाठी ही कारवाई केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

# शेतकऱ्यांना २१ व्या हप्त्याची प्रतिक्षा !

## पीएम किसान निधी ६ नोव्हेंबर पुर्वी हप्ता मिळण्याची शक्यता

पुणे । प्रतिनिधी

**देशातील कोट्यावधी शेतकरी पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या २१ व्या हप्त्याची प्रतीक्षा करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी या आठवड्यात वाराणसी दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान ते शेतकऱ्यांच्या खात्यात २ हजार रुपये वितरीत करु शकतात, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.**




यापूर्वी, पंतप्रधानांनी पीएम किसान योजनेचा २० वा हप्ता लाभार्थ्यांच्या खात्यात हस्तांतरित केला होता. २ ऑगस्ट २०२५ रोजी, वाराणसी येथून त्यांनी थेट लाभार्थी हस्तांतरण अर्थात डीबीटीद्वारे देशभरातील ९.७१ कोटींहून अधिक शेतकऱ्यांसाठी २०,८४३ कोटी रुपयांहून अधिक रक्कम हस्तांतरित केली होती. ६ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदानापूर्वी मोदी पुढील हप्ता जारी करतील, अशी शक्यता अधिक आहे.

या योजनेअंतर्गत, शेतकऱ्यांना दरवर्षी ६ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. प्रत्येकी २ हजारांच्या तीन हप्त्यांमध्ये ही रक्कम वितरीत केली जाते. काही वृत्तांनुसार, केंद्र सरकारकडून नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात, ५ नोव्हेंबरपर्यंत २ हजार रुपयांचा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात हस्तांतरित केला जाऊ शकतो. जर असे झाले तर, २१ व्या हप्त्याची वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा ठरेल. यावेळी, या योजनेचे पैसे वितरित करत असताना एक मोठा बदल दिसून आला. पंजाब, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमधील ▶▶ पान २ वर

## हिवाळी अधिवेशन दहा दिवस पुढे ढकलले जाणार?



नागपूर। प्रतिनिधी

**विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपुरात ८ डिसेंबर रोजी नियोजित करण्यात आले आहे. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लक्षात घेता अधिवेशनासाठी मनुष्यबळाची कमतरता जाणवू शकते. त्यामुळे अधिवेशन ८ ते १० दिवस पुढे ढकलल्या जाण्याची शक्यता आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अनौपचारिक चर्चेदरम्यान यासंदर्भात संकेत दिले.**

ठेकेदारांच्या काम बंद आंदोलनामुळे अगोदरच हिवाळी अधिवेशनावर संकटाचे ढग दाटले आहेत. मंत्र्यांच्या अनेक बंगल्यांचे काम प्रलंबित आहे. १५० कोटींची बिले थकीत असल्याने ठेकेदारांनी काम बंद आंदोलन सुरू केले आहे. त्यामुळे नागपूरऐवजी मुंबईत अधिवेशनाची चर्चा सुरू झाली होती. मात्र नागपूर करारानुसार विधीमंडळाचे एक सत्र नागपुरमध्ये घेणे बंधनकारक आहे. ▶▶ पान २ वर

## ख्रिश्चन मिशनऱ्यांकडून धर्मांतरामुळे सामाजिक सलोख्याला धोका-हायकोर्ट

रायपूर । प्रतिनिधी

धर्मावर असणारी श्रद्धा दृढनिश्चयाची बाब असते. याची सक्ती करता येत नाही. जेव्हा दानधर्माच्या वेशात धर्मांतर केले जाते तेव्हा ते श्रद्धा आणि स्वातंत्र्य दोन्हींना कमकुवत करते. काही ख्रिश्चन मिशनरी गटांकडून होणारे तथाकथित प्रलोभनाने धर्मांतर करणे ही केवळ धार्मिक चिंता नाही, तर तो एक सामजिक धोका ठरतो. अशा पद्धती श्रद्धेच्या भावनेला विकृत करतात आणि सांस्कृतिक जबरदस्ती करतात. या प्रक्रियेमुळे आदिवासी समुदायांमधील सामाजिक सलोख्याला धोका निर्माण झाला आहे, अशा शब्दांमध्ये छत्तीसगड उच्च न्यायालयाने ख्रिश्चन



मिशनऱ्यांकडून होणाऱ्या धर्मांतरावर ताशेरे ओढले.

छत्तीसगडमधील विविध गावांमध्ये ख्रिश्चनांच्या प्रवेशावर बंदी घालणाऱ्या याचिकांवर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने विविध प्रलोभनातून केले जाणाऱ्या धर्मांतरवर भाष्य केले. पाद्री आणि धर्मांतरित ख्रिश्चन यांना प्रवेश प्रतिबंधित आहे, ▶▶ पान २ वर

# अजित पवार अशा कोणत्या 'रूपात' अडकलेत !

## महिला चारित्र्यहनन करणाऱ्या रुपाली चाकणकर अजून पदावर कशा–प्रकाश महाजन



सोलापूर । प्रतिनिधी

डॉक्टर आत्महत्या प्रकरणावरून मनसेचे माजी प्रवक्ते प्रकाश महाजन यांनी रुपाली चाकणकर आणि जयकुमार गोरे यांच्यावर जोरदार टीका केली. मृत डॉक्टर महिलेचे चारित्र्यहनन करणाऱ्या रुपाली चाकणकर अजूनही पदावर कशा. अजित पवार अशा कोणत्या रूपात अडकलेत, असा प्रश्न त्यांनी विचारला. जयकुमार गोरे सारखे लोक हे मूळचे बाहेरचे आहेत, बाहेरून येताना त्यांनी सोबत रोग आणल्याची ▶▶ पान २ वर

### पंकजा मुंडेच वारसदार, पाशा पटेल उपटसुंभ

गोपीनाथ मुंडे यांच्या वारस कोण यावर बोलणाऱ्या पाशा पटेल याना देखील महाजन यांनी सुनावले. कोण पाशा पटेल, तो तर उपटसुभ, अशी टीका महाजन यांनी केली. ते म्हणाले की, पाशा पटेल इतका मतलबी आणि संधीसाधू माणूस सापडणार नाही. ज्यावेळेस गोपीनाथ मुंडे यांचे निधन झालं आणि त्यांचं पार्थिव परळीत आले, तेव्हा धनंजय अंत्यसंस्कार करावे असे म्हणणार पाशा पटेल होता. त्यांना माहिती नाही का गोपीनाथ मुंडे आणि पंकजा मुंडे यांच्याविषयी धनंजय मुंडे यांनी काय उद्गार काढले होते. त्यामुळे तो कसं काय वारस होऊ शकतो? पाशा पटेल यांना त्यांची मुलं वारस ठरवतील का हे बघावे. गोपीनाथ मुंडे यांचा वारसा ठरवण्याचा हक्क हा त्यांच्यावर प्रेम करणाऱ्यांना आणि ओबीसी वर्गाला आहे. गोपीनाथ मुंडे यांचा वारसा फक्त पंकजा आहेत, दुसरे कोणी नाही असे प्रकाश महाजन म्हणाले.

## रुपाली ठोंबरे यांचे चाकणकरांविरोधात आंदोलन

पुणे । प्रतिनिधी

रुपाली ठोंबरे पाटील यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) नेत्या रुपाली चाकणकर यांच्याविरोधात गुडलक चौकात आंदोलन सुरू आहे. चाकणकरांनी राज्या महिला आयोगाच्या अध्यक्ष पदाचा राजीनामा द्यावा, या प्रमुख मागणीकरिता हे आंदोलन करण्यात येत आहे. अजित पवार गटाच्या नेत्या रुपाली ठोंबरे पाटील आणि महिला प्रदेशाध्यक्ष आणि महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर या दोघींमध्ये चांगलीच जुंपली आहे. रुपाली ठोंबरे पाटील यांनी गुंड पाठवून आपल्या मारहाण केल्याचा दावा माधवी खंडाळकर यांनी फेसबुक लाईव्ह करुन केला होता.

## फलटण प्रकरणात सीडीआर लीक कसा झाला?

### पीडित कुटूंबियाच्या भेटीनंतर सुळे यांचा सरकारला सवाल

बीड । प्रतिनिधी

सोमवारी खासदार सुप्रिया सुळे यांनी पीडित कुटुंबियांची वडवणी तालुक्यातील कवडगाव येथे जाऊन भेट घेत या घटनेबाबत काही महत्वाचे सवाल उपस्थित केले आहेत. या प्रकरणातील सीडीआर रिपोर्ट लीक कसा झाला? असा सवाल उपस्थित करत एक एसआयटी स्थापन करा आणि त्या एसआयटीची जबाबदारी एका निवृत्त न्यायाधीशांकडे



देऊन या प्रकरणाचा तपास करा. पीडित कुटुंबियांना न्याय देण्याची नैतिक जबाबदारी राज्य सरकारसह आपल्या सर्वांची आहे, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. ▶▶ पान २ वर

## ॲड.असीम सरोदें यांची सनद तीन महिन्यांसाठी निलंबित

पुणे । प्रतिनिधी

**सुप्रसिद्ध विधिज्ञ असीम सरोदे यांना त्यांनी विधानसभा अध्यक्ष आणि राज्यपाल यांच्याबाबत केलेले विधान आता भोवले आहे. कारण त्यांनी संविधानिक पदावर बसलेल्या दोन व्यक्तींबाबत केलेल्या विधानामुळे त्यांची वकिलीच सनद तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात आली आहे.**



महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलने सोमवारी (३ नोव्हेंबर) हा निर्णय घेतला. ॲडव्होकेट विवेकानंद घाटगे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने हे निर्देश दिलेले आहेत. असीम सरोदे यांनी एका सार्वजनिक कार्यक्रमात न्यायव्यवस्था, राज्यपाल आणि विधानसभा अध्यक्ष यांच्यासंदर्भात आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. त्यामुळे असीम सरोदे यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. वकील असीम सरोदे यांनी एका सार्वजनिक कार्यक्रमामध्ये न्यायव्यवस्था, राज्यपाल आणि विधानसभा अध्यक्ष यांच्या संदर्भात काही वादग्रस्त वक्तव्ये केली होती. त्यामुळे सरोदेंनी केलेल्या वक्तव्यांमुळे ▶▶ पान २ वर

## भाजप नेते आशिष शेलारांनी मान्य केला मतदार यादीतील घोळ; पवार–ठाकरेंनी मानले आभार

मुंबई । प्रतिनिधी

मतदार यादीतील कथित घोळावरून मनसे आणि महाविकास आघाडीने (मविआ) निवडणूक आयोगाविरोधात काढलेल्या 'सत्याचा मोर्चा' आणि केलेल्या आरोपांना भारतीय जनता पक्षाचे नेते व मंत्री आशिष शेलार यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. विरोधकांना केवळ 'हिंदू दुबार मतदार' दिसत असून, त्यांच्या मतदारसंघात मोठ्या संख्येने असलेल्या मुस्लिम आणि ख्रिश्चन दुबार मतदारांवर ते मौन बाळगून आहेत, असा पलटवार ▶▶ पान २ वर

## सायबर चोरट्यांनी देशभरातून तब्बल ३ हजार कोटीं लूटले !

नवी दिल्ली । वृतसंस्था

डिजीटल अरेस्ट प्रकरणांमध्ये देशभरातील नागरिकांकडून ३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्तीची रक्कम लुटण्यात आली आहे. फसवणूक झालेल्यांमध्ये ज्येष्ठ नागरिकांचा देखील समावेश आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर केंद्रीय गृह मंत्रालय आणि केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) ने सादर केलेल्या अहवालात ही आकडेवारी समोर आली. ▶▶ पान २ वर






## स्थानिक नेत्यांचा स्वबळाचा नारा महायुती–आघाडीच्या नेत्यापुढे पेच

बीड–पुणे । प्रतिनिधी

पुढील आठवड्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांची आचारसंहिता लागण्याची दाट शक्यता असताना, प्रत्येक पक्षाने निवडणुकीची तयारी केली आहे .अशातच सर्वच पक्षाच्या स्थानिक नेत्यांनी स्वबळावर निवडणुका लढवण्याची तयारी दर्शवली आहे, मात्र राज्य पातळीवर महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये पुन्हा सलोखा घडणार आहे की नाही हे अद्याप निश्चित झाले नसले तरी स्थानिक नेत्यांनी स्वबळाची




भाषा सुरू केल्यामुळे राज्य पातळीवरील महायुती आणि महाविकास आघाडी मधील नेत्यापुढे मोठा पेच निर्माण झाला आहे.

गेल्या तीन वर्षापासून स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महानगरपालिका नगरपालिका, नगरपंचायत जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका रखडल्या आहेत. मध्यंतरी काही न्यायालयीन अडचणीमुळे निवडणुका पुढे ढकलत होते परंतु आता न्यायालयाने मागील मतदार यादी आणि १९ च्या निर्णयानुसारच निवडणुका घेण्याचे निर्देश राज्य सरकारला दिल्यामुळे आता या किंवा पुढील आठवड्यामध्ये आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. प्रारंभी नगरपालिका निवडणुका होण्याची शक्यता वर्तवली जात असताना राज्यातील प्रमुख पक्ष असलेल्या भाजप, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार गट त्यासोबतच महाविकास आघाडी मधील राष्ट्रवादी काँग्रेस ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३ नोव्हेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४०.०० क्विंटल | २,५५१ | २,८९० | २,७३३ |
| ज्वारी/हायब्रिड :४७.५० क्विंटल | २,४०० | ३,३७० | २,९१० |
| मका/लोकल: ५०.०० क्विंटल | १,९५० | १,९५० | १,९५० |
| तूर : १०.५० क्विंटल | ६,८५१ | ६,८५१ | ६,८५१ |
| उडीद : १८.५० क्विंटल | ३,८५० | ५,२३६ | ४,७३० |
| बाजरी: ३६.५० क्विंटल | २,४७६ | २,७५० | २,६३६ |
| मुग:४.५० क्विंटल | ४,९०० | ५,७०१ | ५,३०० |
| सोयाबीन: ६०.०० क्विंटल | ४,२७५ | ४,४५० | ४,३६० |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ५,१०१ | ५,१०१ | ५,१०१ |

cmyk

## अग्रलेख

# सत्यासाठी विरोधकांचे रणशिंग

मुंबईच्या रस्त्यांवर शनिवारी पुन्हा एकदा जनसमुदाय उतरला, घोषणा घुमल्या आणि महाराष्ट्रातील राजकारणात तापमान वाढलं. मतदार यादी घोळाच्या मुद्यावरुन मुंबईत राजकीय वातावरण ढवळून निघालं. महाविकास आघाडी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने एकत्र येत ''सत्याचा मोर्चा'' काढून राज्यातील निवडणूक प्रक्रियेतील अनियमिततेविरोधात तीव्र भूमिका घेतली. हा केवळ एक मोर्चा नव्हे, तर लोकशाहीतील विश्वासावरच प्रश्नचिन्ह उभं करणारा प्रसंग ठरला आहे. गेल्या काही दिवसांपासून या मोर्चाची चर्चा होत होती. अखेर अतिभव्य मोर्चा मनसे नेते राज ठाकरे यांच्या उपस्थितीत महाविकासआघाडीने काढलाच आणि आपल्या प्रमुख मागण्या सरकारपुढे मांडल्या. या प्रकरणात निवडणूक आयोगावर मूळ आरोप असले तरी सत्ताधारी देखील या कचाट्यात सापडलेले आहेत. या मोर्चाचा केंद्रबिंदू ठरला तो मतदार याद्यांतील मोठ्या अनियमिततेचा आरोप.

विरोधी पक्षांचा दावा आहे की राज्यात तब्बल ९६ लाख खोटे मतदार यादीत सामील केले गेले आहेत. या संख्येचा फटका निवडणुकांच्या निकालांवर होऊ शकतो, असा त्यांचा आरोप आहे. निवडणूक आयोगावर पक्षपातीपणाचा आणि दुर्लक्षाचा आरोप करत, विरोधकांनी या मोर्चाद्वारे नागरिकांचे लक्ष या गंभीर मुद्याकडे वेधले आहे. निवडणुका हे लोकशाहीचं अधिष्ठान आहे. जर मतदार याद्याच संशयास्पद ठरल्या, तर लोकशाहीची विश्वसनीयता धोक्यात येते. हा प्रश्न केवळ पक्षीय हिताचा नाही, तर नागरिकांच्या अधिकाराचा आहे. त्यामुळे हा मुद्दा विरोधक मांडत आहेत असे न मानता तो मतदारांच्या मौलिक हक्काचा आहे हे लक्षात घेतले पाहिजे. मुंबईमध्ये झालेल्या भव्य या मोर्चाचे आकर्षण अर्थातच उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या उपस्थितीमुळे वाढले नव्हे तर या मोर्चाला खऱ्या अर्थाने शोभा आली, असे म्हणायला हवे. उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयोगाच्या निक्रियतेवर हल्ला चढवत विचारलं की, ''मतदारांच्या नावांची चोरी होत असेल तर मग लोकशाही कुठे उरली?'' राज ठाकरे यांनी नेहमीप्रमाणेच तीक्ष्ण शब्दांचा वापर करत म्हटलं ''सत्याचा मोर्चा म्हणजे सत्यासाठीचा लढा आहे. मतदार यादीच जर का बनावट असेल, तर निवडणुकीचं औचित्य काय?'' आदित्य ठाकरे यांनी थेट इशारा दिला की ''मतदार याद्यांतील खोटेपणा दुरुस्त झाला नाही, तर आम्ही पुन्हा रस्त्यावर येऊ.'' या भाषणांनी उपस्थित जनसमुदायात उत्साह निर्माण केला आणि एकत्रित विरोधी एकतेचा ठसा उमटवला हे लक्षात घेतले पाहिजे.

'सत्याचा मोर्चा' हा फक्त प्रतीकात्मक नव्हता. दक्षिण मुंबईतील फॅशन स्ट्रीटपासून महापालिका मुख्यालयापर्यंत निघालेल्या या मोर्चाने प्रशासनालाही हादरा दिला. मोठ्या प्रमाणात वाहतूक बंदी, पोलीस बंदोबस्त आणि नागरिकांची गैरसोय झाली असली तरी, विरोधकांनी आपला दबाव निर्माण करणे हा हेतू साधला. लोकांची मोर्चाला असलेली उपस्थिती विरोधकांची हिंमत वाढवण्यास उपयुक्त ठरणारी होती. राज्य सरकार आणि निवडणूक आयोगावर या मोर्चामुळे सार्वजनिक व मीडियाचा दबाव वाढला आहे. जनतेच्या मनात एक प्रश्न ठळक झाला आहे ''जर खोटे मतदार आहेत, तर त्यांना कोण जबाबदार? त्यांना कसे हटवले जाणार?'' हा दबाव राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा ठरतोय, कारण पुढील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी मतदारांच्या विश्वासाचा मुद्दा निर्णायक ठरू शकतो. विरोधकांचा मुद्दा योग्य असू शकतो, पण तो फक्त राजकीय गदारोळापुरता राहिला, तर त्याचे अर्थ कमी होतात. आकडेवारी आणि पुरावे जर ठोस नसतील, तर जनतेच्या भावनांवर आधारित आंदोलनाचा परिणाम दीर्घकाळ टिकत नाही. पण सतत आरोप होत असतील तर प्रशासनावर अविश्वास वाढतो. निवडणूक आयोगाने या आरोपांवर तातडीने कारवाई करून पारदर्शक तपास सुरू करावा, हीच लोकशाहीची अपेक्षा आहे. अन्यथा ''विरोधकांना पोलीस परवानगी नाही, पण खोट्या मतदारांना मोकळं मैदान आहे'' असा समज जनतेत प्रचलित होईल. या मोर्चाने महाविकास आघाडी व मनसेमध्ये एका नव्या समन्वयाची झलक दाखवली. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एका व्यासपीठावर आले, हे स्वत:तच महत्त्वाचे राजकीय संकेत आहे. पण, काँग्रेस, राष्ट्रवादी आणि इतर विरोधी पक्ष राज ठाकरे यांना दूर ठेवण्याचे धाडस यापुढे करणार नाहीत हेही दिसून आले. विरोधी एकतेचा हा प्रयोग भविष्यातील निवडणुकांसाठी नवे समीकरण निर्माण करू शकतो. ''सत्याचा मोर्चा'' ही संज्ञाच मुळात मनोवैज्ञानिक पातळीवर जनतेत विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. जणू काही सत्याच्या बाजूने उभं राहणं म्हणजे विरोधकांच्या बाजूने उभं राहणं असा प्रचार विरोधकांनी चालवला आहे. त्यामुळे मुंबईतील शनिवारचा मोर्चा केवळ काही नेत्यांचे भाषण किंवा रस्त्यावरचं प्रदर्शन नव्हे; तो होता लोकशाहीतील विश्वासाच्या मूलभूत प्रश्नाचा उच्चार. मतदार याद्यांतील पारदर्शकता आणि प्रशासनाचे उत्तरदायित्व यावरच लोकशाहीचा पाया टिकून असतो. विरोधकांनी आज प्रश्न उपस्थित केला आहे; आता उत्तर देण्याची जबाबदारी निवडणूक आयोगावर जास्त आहे. सरकारने त्यांच्या आधी उत्तर देऊ नये. कारण सत्य फक्त मोर्चात नाही, तर निवडणुकीत आणि तिच्या निष्पक्षतेत दिसलं पाहिजे आणि जर तेच धूसर झालं, तर मग ''सत्याचा मोर्चा'' हा केवळ घोषणांचा कार्यक्रम न राहता तो लोकांचाही विचार बनतो. सरकारने हे लक्षात घ्यावे. लोकसभा निवडणुकीत संविधान हा असाच मुद्दा ठरला होता आणि सरकारपक्षाचे लोक वादग्रस्त वक्तव्ये थांबवत नव्हते. त्याचा परिणाम केंद्राच्या सत्तेत कुबड्या घेण्यात झाला आणि त्या कुबड्या महाराष्ट्रासारख्या राज्यात बळेबळे घेऊन चालावे लागते या सत्याकडे दुर्लक्ष होऊ नये.

# मुलीचे अपहरण: ऊसतोड मजुराचा मुलीच्या वडिलांना थेट कॉल!

केज | प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात एका अल्पवयीन मुलीच्या अपहरणाचा अत्यंत धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. गावातील एका १६ वर्षीय ऊसतोड मजुराने १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण केले इतकेच नव्हे, तर चक्क तिच्या पित्याला फोन करून मुलीचे अपहरण केल्याची माहिती दिली. या थरारक 'सिनेमा स्टाईल' घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.**

केज तालुक्यातील एका खेडेगावातील अल्पवयीन मुलीचे वडील ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनावर चालक म्हणून काम करतात. शनिवार, दि. १ नोव्हेंबर रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास ही १५ वर्षीय मुलगी बेपत्ता झाली. मुलीच्या आई-वडिलांनी रात्री उशिरापर्यंत सर्व नातेवाईकांकडे तिचा शोध घेतला, पण ती कुठेही आढळली नाही. रविवार, दि. २ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास मुलीचे वडील केज येथे पाहुण्यांकडे मुलीचा शोध घेत असतानाच, गावातील ऊसतोड मजुरीचे काम करणाऱ्या अविवाहित तरुणाने त्यांना त्यांच्या मोबाईलवर कॉल केला. आरोपीने अत्यंत बेधडकपणे सांगितले, ''तुमची मुलगी माझ्यासोबत आहे!'' यावर मुलीच्या पित्याने घाबरून, ''गुपचूप माझ्या मुलीला घरी आणून सोड,'' अशी विनवणी केली. मात्र, आरोपी तरुणाने मुलीला कुटुंबाच्या ताब्यात देण्यास नकार दिला. या घटनेमुळे मुलीच्या वडिलांनी तातडीने रविवारी (दि. २) केज पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. अल्पवयीन मुलीचे अपहरण करणाऱ्या आरोपी तरुणाविरुद्ध केज पोलिसात गुन्हा (अपहरण, कलम ३६३) नोंद करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक उमेश निकम हे अल्पवयीन मुलीचा आणि आरोपी तरुणाचा शोध घेत आहेत.

# लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या भ्रष्टाचार निर्मूलन जनजागृती सप्ताहाची सांगता

## लाचखोरी विरोधात नागरिकांनी तक्रारी कराव्यात-डीवायएसपी सोपान चिटमपल्ले





बीड | प्रतिनिधी

लाच लुचपत प्रतिबंधक विभागामार्फत भ्रष्टाचार निर्मूलन जनजागृती सप्ताह दिनांक २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर दरम्यान साजरा करण्यात आला. या सप्ताहाच्या समारोह निमित्ताने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे डीवायएसपी सोपान चिटमपल्ले म्हणाले, 'लाचखोरी विरोधात नागरिकांनी पुढे येऊन तक्रारी केल्या पाहिजेत. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवले जाते. लाच मागणाऱ्या लोकसेवका बाबत काही तक्रार असल्यास तक्रारदारांनी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. पोलीस निरीक्षक राहुलकुमार भोळ, समाधान कवडे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सुरेश सांगळे, पोलीस अंमलदार मच्छिंद्र बीडकर, अनिल शेळके, पांडुरंग काजगुडे, अमोल खरसाडे, अविनाश गवळी, संतोष राठोड, राजू कुमार आघाव, बिभीषण सांगळे, सचिन काळे, गणेश मेहत्रे, अंबादास पुरी आदींनी जनजागृतीची रॅली काढून प्रसार आणि प्रचाराचे कार्य केले. भित्तिपत्रके व माहितीपत्रकाचे वितरण केले. यावेळी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक सोपान चिटटपल्ले यांच्या अध्यक्षतेखाली व भागवत वराट, नवनाथ नाईकवाडे यांच्या उपस्थितीत तक्रारदारांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे संचालन हवालदार अनिल शेळके यांनी केले.

# देशी-विदेशी दारू बंद असताना विक्री?

## विकणारा सोडला घेणारा पकडला

अंबड | प्रतिनिधी

**कार्तिक एकादशी असल्यामुळे शासनाने दारू दुकान बंद आदेश काढला असतानी देशी दारू विक्री होती कशी तिची पण चौकशी पोलिसांनी करणे गरजेचे आहे. देशी दुकान मालकावर गुन्हा दाखल करणे गरजेचे आहे.**

अंबड शहरातील मटण मार्केट रोडवरील देशी दारू दुकान व प्रिन्स बार शासनाचा नियम तोडून नियमबाह्य देशी दारू दुकान सकाळी लवकर उघडणे तसेच संध्याकाळी उशिरा बंद करणे असा प्रकार इथे चालत आहे. याप्रकरणी पोलिसांनी कारवाई केली पण बेकायदेशीर देशी विकणारा सोडला व घेणारा पकडला याला म्हणतात चोराच्या उलट्या बोमा देशी दुकानाजवळ गणेश मैंद ह्या व्यक्तीला विनापरवाना देशी-विदेशी दारूची चोरटी विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्या माहितीच्या आधारे, पोलिसांनी गणेश मैंद याला ताब्यात घेतले त्याच्याजवळ असलेल्या एका पिशवीत देशी दारूच्या २१ काचेच्या १८० मिलीच्या सीलबंद बाटल्या (प्रत्येकी बॉटलची किंमत १०० रुपये) असा एकूण रु. २,१००/- (दोन हजार एकशे रुपये) किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गणेश मैद च्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिसांनी केली. देशी दुकान नियमाप्रमाणे बंद असताना मग देशी दारू विक्री होती कशी तिची पण चौकशी होणे गरजेचे आहे

# गिराम साहेब प्लास्टिक जिथे तयार होती तिथे अगोदर कारवाई करा

जालना | प्रतिनिधी

जालना महानगरपालिका चे अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम यांनी प्लास्टिक बंदी करण्यासंदर्भात कारवाई करण्याचे आदेश केले आहे . परंतु गिराम साहेब अगोदर जिथे अगोदर प्लास्टिक तयार होती तिथे कारवाई करावी अशी नाटक बाजी करणे योग्य नाही . जालना शहरात कारवाई करण्याचे आदेश द्यावे असे काही तज्ञ व्यापारी यांच्याकडून बोलल्या जात आहे.शहर महानगरपालिकेतील नवीन जालना व जुना जालना विभागातील सर्व स्वच्छता निरीक्षकांमार्फत शहरात एकल प्लास्टीक बाबत कारवाई करण्यात आली. यामध्ये शहरातील दुकानदार/आस्थापनामध्ये प्लास्टीक साठाबाबत माहिती मिळाल्यानुसार आज दिनांक ०३.११.२०२५ रोजी दुकानदार/आस्थापना सुमीत एजन्सी, फुले मार्केट, नवीन जालना यांच्याकडे प्लास्टीक आढळुन आल्याबाबत त्यांच्यावर ५,०००/- अक्षरी पाच हजार रुपये दंड व ०२ कुंटल ९४ किलो प्लास्टीक जप्त करण्यात आले. तसेच जुना जालना विभागामध्ये ०६ हजार दंड असे एकुण ११०००/- रुपये दंड वसुल करण्यात आला. सदरच्या कार्यवाही ही मा. जिल्हाधिकारी तथा आयुक्त तथा प्रशासक जालना शहर महानगरपालिका यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त, सहायक आयुक्त सर्व स्वच्छता निरीक्षक व इतर कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आली. करिता जालना शहर महानगरपालिकेमार्फत शहरातील सर्व आस्थापना/दुकानदार व नागरिक यांना आवाहन करण्यात येते की, जालना शहर महानगरपालिका व महाराष्ट्र प्रदुषण मंडळामार्फत याबाबत नियमितपणे तपासणी/पाहणी करण्यात आहे. प्लास्टीक वापरकर्त्यांवर दंडनीय कार्यवाही करुन गुन्हा नोंद करण्याबाबतची देखील कार्यवाही करण्यात येणार आहे. करिता एकल प्लास्टीकचा वापर, वाहतुक, विक्री व साठा करु नये याबाबत सहकार्य करावे तसेच शहरात ज्याठिकाणी प्लास्टीक वाहतुक, विक्री, वापर व साठा होत असेल तर याबाबत जालना मनपास अवगत करुन सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

# पान १ वरून...

### हिवाळी अधिवेशन दहा

त्यातच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीची आचारसंहिता लवकरच लागण्याची चिन्हे आहेत. डिसेंबरच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात जिल्हा परिषदेच्या निवडणूकीचे मतदान होईल. त्यात सरकारी यंत्रणादेखील कामात असेल. त्यामुळे त्यानंतरच हिवाळी अधिवेशन घेणे शक्य गोणार आहे. याबाबत विचार सुरू आहे, मात्र कुठलाही निर्णय वगैरे झालेला नाही. अखेरचा निर्णय सर्वसंमतीनेच होईल, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. उपराजधानीसह राज्यात अनेक ठिकाणी विकासकामे सुरू असून, रस्ते वेडेवाकडे खोदून ठेवले जातात. याला प्रामुख्याने जेसीबी चालक जबाबदार असतात. निर्देशांचे पालन न करता ते मनमानी पद्धतीने रस्ते खोदून ठेवतात, त्याचा फटका जनतेला बसतो. त्यामुळे अशा जेसीबीचालकांविरोधात गुन्हे दाखल करण्याचे निर्देश बावनकुळे यांनी दिले आहेत. सोबतच खोदकाम करणाऱ्या नागपुरातील सर्व संबंधित एजन्सीजची एक संयुक्त बैठक येत्या आठवड्यात घेण्याची सूचनाही त्यांनी केली.

-----------

### शेतकऱ्यांना २१ व्या

सुमारे २७ लाख शेतकऱ्यांना २ हजार रुपयांचा हप्ता आगाऊ स्वरुपात देण्यात आला. या राज्यांमध्ये पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ही रक्कम जारी केली होती. आता, इतर राज्यांमधील शेतकरी २१ व्या हप्त्याची वाट पाहात आहेत.

---------------

### अजित पवार अशा कोणत्या

टीकाही महाजन यांनी केली. फलटण महिला डॉक्टरच्या आत्महत्या प्रकरणावरुन प्रकाश महाजन यांनी राज्य सरकारवर ताशेरे ओढले. तसेच गोपीनाथ मुंडे यांच्या वारस कोण यावर बोलणाऱ्या पाशा पटेल यांच्यावरही त्यांनी उपटसुंभ म्हणत टीका केली. फलटण प्रकरणात महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकरांनी पत्रकार परिषद घेऊन मृत महिलेचे चॅट समोर आणले. त्यावरून प्रकाश महाजन यांनी त्यांच्यावर टीका केली. रुपाली चाकणकरांनी त्या मृत महिलेचे चारित्र्यहनन केल्याचे प्रकाश महाजन यांनी म्हटले. ती डॉक्टर बीड जिल्ह्यातील असल्याने आमचे भावनात्मक नाते आहे. एवढे होऊनही रुपाली चाकणकर महिला आयोगाच्या अध्यक्षपदी कशा. अजित पवार कोणत्या रूपात अडकलेत असा प्रश्नही त्यांनी विचारला. मुख्यमंत्री फडणवीस हे रणजीतसिंह निंबाळकर यांना कशी काय क्लीनचीट देऊ शकतात? चौकशीत ते जर निर्दोष असतील तर हरकत नाही. अशा प्रकारची माणसं तुमच्या भोवती गोळा होत असतील तर पक्ष बदनाम होणारच, असे महाजन म्हणाले. जयकुमार गोरे यांच्यावरही प्रकाश महाजन यांनी टीका केली. ते म्हणाले की, गोरे यांनीही मृत महिलेवर भाष्य करत तिचे चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न केला. जयकुमार गोरे यांचे लोकांनी काय काय दाखवले नाही? ज्या महिलेला एक कोटी रुपये देताना ट्रप करण्यात आले. ते एक कोटी कसे आले हे ईडीने त्यांना विचारले. त्यांच्या दृष्टीने स्त्री जर फक्त उपभोगाची वस्तू असेल तर त्यांच्या तोंडून हे वक्तव्य येणार. हे कोणीही मूळ भाजपचे नाहीत, ते बाहेरून आले आहेत, त्यांनी बाहेरून येताना हा रोग आणला आहे. राज्याचा एक मंत्री असं कसं काय बोलू शकतो? समजा त्या महिलेची चॅटिंग असेल तर तुम्ही काय तिला आत्महत्या करायला लावणार का? असा प्रश्न प्रकाश महाजन यांनी विचारला.

---------

### ख्रिश्चन मिशनऱ्यांकडून धर्मांतरामुळे

असा फलक छत्तीसगडमधील कांकेर जिल्ह्यातील आठ गावांमध्ये लावण्यात आला आहे. राज्य सरकारच्या परिपत्रकानुसार पंचायत (अनुसूची क्षेत्र विस्तार) कायदा, १९९६ अंतर्गत त्यांच्या अधिकारांचा वापर करून ग्रामसभांनी हे फलक लावण्यात आले, अशी याचिका छत्तीसगड उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. छत्तीसगडमधील विविध गावांमध्ये ख्रिश्चनांच्या प्रवेशावर बंदी घालणाऱ्या याचिकांवर छत्तीसगड मुख्य न्यायाधीश रमेश सिन्हा आणि न्यायमूर्ती बिभू दत्ता गुरु यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी खंडपीठाने स्पष्ट केले की, संविधान धर्माचा प्रचार करण्याच्या अधिकाराची हमी देते; पण गरीब आणि निरक्षर आदिवासी आणि ग्रामीण लोकसंख्येचे प्रेरित धार्मिक धर्मांतर केल्याने एक विशिष्ट वाद निर्माण झाला आहे. मोठ्या प्रमाणात किंवा प्रेरित धर्मांतराची घटना केवळ सामाजिक सौहार्द बिघडवत नाही तर स्थानिक समुदायांच्या सांस्कृतिक ओळखीलाही आव्हान देते, असे निरीक्षणही खंडपीठाने नोंदवले. भारताची धर्मनिरपेक्ष रचना सहअस्तित्व आणि विविधतेचा आदर यावर भरभराटीला येते. धर्मांतर हे ऐच्छिक आणि आध्यात्मिक असेल तरच विवेकाचा कायदेशीर वापर आहे, असे स्पष्ट करत आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांमध्ये विशेषतः अनुसूचित जमाती आणि अनुसूचित जातींमध्ये उपजीविकेच्या संधी, शिक्षण किंवा समानतेच्या आश्वासनाखाली हळूहळू धार्मिक धर्मांतर झाले. एकेकाळी सेवा म्हणून पाहिले जाणारे हे अनेक प्रकरणांमध्ये धार्मिक विस्ताराचे एक सूक्ष्म साधन बनले. धर्मांतर वैयक्तिक श्रद्धेऐवजी प्रलोभनाने होते तेव्हा ते शोषण बनते. दुर्गम आदिवासी पट्ट्यांमध्ये मिशनऱ्यांवर अनेकदा अशिक्षित आणि गरीब कुटुंबांना लक्ष्य करण्याचा, धर्मांतराच्या बदल्यात त्यांना आर्थिक मदत, मोफत शिक्षण, वैद्यकीय सेवा किंवा रोजगार देण्याचा आरोप केला जातो. अशा पद्धती स्वैच्छिक श्रद्धेच्या भावनेला विकृत करतात आणि सांस्कृतिक जबरदस्ती करतात. या प्रक्रियेमुळे आदिवासी समुदायांमधील सामाजिक सलोख्याला धोका निर्माण झाला आहे, असे परखड भाष्यही खंडपीठाने केले. धर्मांतरामुळे आदिवासींच्या स्थानिक भाषा, विधी आणि प्रथा कायदे नष्ट होतात. नवीन धर्मांतरित झालेल्या व्यक्तींना कधीकधी त्यांच्या मूळ समुदायाकडून नाकारले जाते. यामुळे नवा सामाजिक प्रश्न निर्माण होतो. धर्मांतर राजकीय प्रतिनिधित्वावर देखील परिणाम करू शकते. अनुसूचित जमाती किंवा अनुसूचित जातीचा दर्जा यासारखे काही संवैधानिक फायदे धर्माशी जोडलेले असल्याने धर्मांतर लोकसंख्याशास्त्रीय नमुने आणि राजकीय समीकरणे बदलू शकते. समाजातील गुंतागुंतीचा आणखी एक थर वाढू शकतो, असेही खंडपीठाने नमूद केले.

----------

### ॲड.असीम सरोदें यांची

न्यायव्यवस्थेचा अपमान झाला आणि न्यायालयांविषयी अविश्वास निर्माण झाल्याची तक्रार एका तक्रारदाराने केली होती. असीम सरोदेंचे वक्तव्य अशोभनीय, गैरजबाबदार व बदनामीकारक असल्याचे नमूद करून बार कौन्सिलकडे याबाबत तक्रार दाखल करण्यात आली होती. तक्रारदाराने १९ मार्च २०२४ रोजी सरोदेंना लेखी माफी मागण्याची संधी दिली, पण त्यांनी ती नाकारली. त्यामुळे आता त्यांची वकिलीची सनद तीन महिन्यांसाठी रद्द करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले आहे. या तक्रारीनंतर वकील विवेकानंद घाटगे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने असीम सरोदे यांच्या भाषणाचे ट्रान्सक्रिप्ट आणि व्हिडिओ क्लिप पाहिल्या होत्या. ज्यानंतर त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

--------

### सायबर चोरट्यांनी देशभरातून

डिजीटल अरेस्ट प्रकरणांमध्ये वाढ होत आहे. देशभरातील आकडेवारी धक्कादायक असून यासंबंधी कठोर आदेश दिले नाहीत तर ही समस्या वाढेल, असे सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी म्हटले. हे प्रकरण अत्यंत कठोरपणे हाताळणार असल्याचे न्यायालयाने म्हटले. न्यायालयीन आदेशांद्वारे आपल्याला तपास यंत्रणेचे हात मजबूत करावे लागतील, असे न्यायालयाने म्हटले. देशभरातील डिजिटल अरेस्ट प्रकरणांच्या वाढत्या धोक्याला तोंड देण्यासाठी न्यायालयाने स्वतःहून (सुमोटो) सुरू केलेल्या खटल्याची सुनावणी न्यायालय करत होते. या प्रकरणी पुढील सुनावणी १० नोव्हेंबर रोजी होणार आहे. सुनावणीवेळी केंद्र आणि सीबीआयची बाजू मांडणारे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले की, गृह मंत्रालयाचा सायबर गुन्हे विभाग या मुद्द्यांवर काम करत आहे.

----------

### भाजप नेते आशिष शेलारांनी मान्य केला मतदार

शेलार यांनी केला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना शेलार यांनी मविआकडून 'ठरवून फेक नरेटिव्ह' तयार केला जात असल्याचा आरोप केला. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्या कर्जत-जामखेड मतदारसंघात ५ हजार ५३२ मुस्लिम दुबार मतदार असून, ते स्वतः अवघ्या १ ते दीड हजार मतांनी निवडून आले आहेत. तसेच, मुंब्रामध्ये ३० हजारांहून अधिक आणि नाना पटोले यांच्या साकोली मतदारसंघात ४०० हून अधिक मुस्लिम दुबार मतदार असल्याचा दावा शेलार यांनी केला. शेलार म्हणाले, ''राज ठाकरे यांनी सांगितलेल्या मतदारसंघात त्यांना केवळ भोईर, पाटील अशी आडनावे दिसली, पण 'आसमा' दिसली नाही. त्यांच्या भूमिकेतून त्यांना केवळ मराठी माणूस आणि हिंदू दुबार मतदारच दिसले का?'' ते म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत मविआने अनेक प्रामाणिक मतदारांची नावे वगळून 'व्होट-जिहाद' केला. मुस्लिम आणि ख्रिश्चन समाजाचे एकूण १६ लाख ८४ हजार २५६ दुबार मतदार असू शकतात, असेही त्यांनी सांगितले. शेलार यांच्या वक्तव्यावर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपरोधिक टीका केली. शेलार यांनी मतदार याद्यांमध्ये घोळ असल्याचे मान्य केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करत, नकळतपणे त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना महाराष्ट्राचे 'पप्पू' ठरवले आहे, असे विधान उद्धव ठाकरे यांनी केले. दुसरीकडे, आमदार रोहित पवार यांनीही मतदार यादीतील घोळ मान्य केल्याबद्दल शेलार यांचे आभार मानले. आता मुंबईत येत असून, आपण संयुक्त पत्रकार परिषदेत संयुक्तपणे ही बाब लोकांसमोर मांडू आणि एकत्रित लढू व लोकशाही वाचवू, असे आवाहन त्यांनी शेलारांना केले. दरम्यान, शेलार यांच्या टिकेला मनसे नेते संदीप देशपांडे यांनी प्रत्युत्तर दिले. आमच्या दृष्टीने दुबार मतदार म्हणजे दुबार मतदारच, तो हिंदू, मुस्लिम किंवा कुठल्याही धर्माचा आणि जातीचा नाही. आशिष शेलार आमच्या मताशी सहमत झाले असतील, तर त्यांनी आमच्या सत्याच्या मोर्चात सामील व्हायला पाहिजे होते जो निवडणूक आयोगाविरोधात होता, असे देशपांडे म्हणाले. शेलार यांना मतदारांमध्येही जात दिसली, अशी टीकाही त्यांनी केली. शेलार यांनी दुबार मतदारांचा मुद्दा उपस्थित केल्याने आता दुबार मतदार हा आगामी विधानसभा निवडणुकीतील एक महत्त्वाचा आणि विवादास्पद मुद्दा बनण्याची चिन्हे आहेत.

------------

### स्थानिक नेत्यांचा स्वबळाचा नारा

शरद पवार गट, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आणि राष्ट्रीय काँग्रेस या सोबतच मनसे, समाजवादी पक्ष या सर्वांनी नगरपालिका, महानगरपालिका आणि नगरपंचायत क्षेत्राचा आढावा घ्यायला सुरूवाते केली आहे. शिवाय स्थानिक कार्यकर्त्यांसोबत जिल्हा प्रमुख आढावा बैठक घेत आहेत. या बैठकांमधून स्वबळावर निवडणुका लढवण्याचा निर्धार आता कार्यकर्ते बोलू लागले आहेत. महाविकास आघाडी असो की महायुती असो या दोन्ही पक्षातील घटक पक्षांनी व त्यांच्या कार्यकर्त्यांनी स्वभावावर निवडणुका लढवण्याचा विचार पुढे मांडल्यामुळे आता वरिष्ठ पातळीवर नेत्यांची मोठी अडचण निर्माण झाली आहे. विशेषतः सर्वच पक्षांनी स्वबळावर निवडणुका लढवाव्यात अशीच भावना कार्यकर्त्यांची आहे. मुंबई, नाशिक, ठाणे, छत्रपती संभाजी नगर या मोठ्या महानगरपालिका महायुती व महाविकास आघाडी असे म्हणूनच लढले जाईल. परंतु राज्यातील इतर नगरपालिकामध्ये युती, आघाडी झाल्या तरी बंडखोरी होणार हे निश्चित आहे. कारण स्थानिक कार्यकर्त्यांनी स्वबळाची भाषा आतापासूनच सुरू केली आहे. बीड जिल्ह्यामध्ये देखील त्याचे पडसाद उमटत आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यात बैठकांचा जोर सर्वच पक्षांनी वाढवल्याचे दिसत आहेत.

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि. ४ नोव्हेंबर २०२५


# 'वंदे मातरम' गीत पाच हजार नागरिक सामूहिकरित्या गाणार

## नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे- तहसीलदार महिंद्रकर



**वडवणी । प्रतिनिधी**

**देशभक्तीच्या ओजस्वी परंपरेचा गौरवशाली ठेवा असलेले 'वंदे मातरम्' हे गीत यंदा दीडशे वर्षे पूर्ण करत आहे. या ऐतिहासिक निमित्ताने वडवणी येथे वंदे मातरम्? सार्धशताब्दी महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमात सुमारे पाच हजार विद्यार्थी आणि नागरिक सामूहिकरित्या 'वंदे मातरम्' हे गीत गायन करणार आहेत. तरी वडवणी तालुक्यातील सर्व शासकीय कर्मचारी, नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन वंदे मातरम्? सार्ध शताब्दी महोत्सव समितीचे अध्यक्ष तथा तहसीलदार वैभव महिंद्रकर यांनी केले आहे.**

वडवणी तहसील कार्यालयात तहसीलदार वैभव महिंद्रकर यांच्या अध्यक्षतेखाली महोत्सव समितीची बैठक सोमवार दि.३ नोव्हेंबर रोजी तहसील कार्यालयात पार पडली. या बैठकीत कार्यक्रमाचे सविस्तर नियोजन, जबाबदाऱ्या, तसेच विविध शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था व सामाजिक संघटनांचा सहभाग निश्चित करण्यात आला. दि. ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ९:३० वाजता महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात हा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. या कार्यक्रमात देशभक्तीपर लघुनाटिका, व्याख्यान, विविध कार्यक्रम, तसेच वडवणी तालुक्यातील सर्व शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग असणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन स्व. महिपती गणपतराव कोठुळे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वडवणी यांच्या वतीने करण्यात आले आहे. या संस्थेने तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था आणि नागरिकांना सक्रिय सहभागासाठी आवाहन केले आहे. बैठकीत तहसीलदार वैभव महिंद्रकर, पोलीस अधिकारी, गटविकास अधिकारी, गटशिक्षण अधिकारी, विविध विभागांचे अधिकारी, तसेच समिती सदस्य उपस्थित होते. बैठकीत कार्यक्रमाचे नियोजन, व्यवस्थापन, विद्यार्थ्यांच्या सहभागाचे समन्वयन, आणि सांस्कृतिक सादरीकरणांच्या वेळापत्रकाचा आढावा घेण्यात आला. तहसीलदार वैभव महिंद्रकर यांनी यावेळी सांगितले की, वंदे मातरम्? हे गीत आपल्या स्वातंत्र्यलढ्यातील प्रेरणादायी प्रतीक आहे. या गीताच्या १५० व्या वर्धापनदिनानिमित्त वडवणी तालुका देशभक्तीच्या एका सुरात सामील होणार आहे. या प्रसंगी नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून इतिहासातील हा क्षण साक्षीभावाने अनुभवावा. या कार्यक्रमाच्या माध्यमातून वडवणी तालुक्यात देशभक्तीचे वातावरण निर्माण होऊन युवकांमध्ये राष्ट्रभावनेचा नवा उत्साह निर्माण होईल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. तरी वडवणी तालुक्यातील सर्व शासकीय कर्मचारी, नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन वंदे मातरम्? सार्ध शताब्दी महोत्सव समितीचे अध्यक्ष तथा तहसीलदार वैभव महिंद्रकर यांनी केले आहे.

# जिल्ह्यात २०९ हंगामी अनिवासी वस्तीगृहाला मान्यता

## २२ हजार २९४ विद्यार्थी घेणार भोजनाचा लाभ

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेच्या समग्र शिक्षा अभियान अंतर्गत सन २०२५- २६ या वर्षात ऊसतोड कामगारांच्या पाल्यासाठीच्या जिल्ह्यात २०९ हंगामी वस्तीगृहास मान्यता देण्यात आली आहे. बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी १३ ऑक्टोबर रोजी वसतिगृह सुरु करण्यास मान्यता दिली आहे. शाळा व्यवस्थापन समिती मार्फत सदर वस्तीगृह चालविले जातात. सदर वस्तीगृह तात्काळ सुरू करण्यात आली असून यामध्ये २२,२९४ स्थलांतरित कामगारांचे पाल्य जेवणाचा लाभ घेणार आहेत.



राज्य शासनाने बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगार आणि अन्य स्थलांतरित होणाऱ्या कामगारांच्या पाल्यासाठी प्रतिवर्षी अनिवासी हंगामी वस्तीगृह सुरू केली जातात. यावर्षी ऊसतोड कामगारांचे स्थलांतर सदर वस्तीगृह सुरू करण्यास मान्यता मिळाली आहे. गजा शाळा व्यवस्थापन समितीमार्फत चालविण्यात येत असलेल्या या वस्तीग्रह साठी तालुकास्तरावर प्रस्ताव दाखल झाले त्या संबंधित गट शिक्षणाधिकारी यांनी सदर प्रस्तावाची छाननीनुसार जिल्हा कार्यालयाला वस्तीगृह सुरू करण्याबाबतची मागणी केली. तालुकास्तरीय मागणीनुसार जिल्हास्तरावर छाननी करून शिक्षणाधिकारी यांच्या शिफारशीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी २०९ प्रस्तावास पहिल्या टप्प्यात मान्यता दिली आहे. तालुका न्याय सुरू करण्यात आलेली वस्तीगृहाची संख्या व विद्यार्थी संख्या पुढील प्रमाणे आहे.

अंबाजोगाई तालुक्यात वस्तीगृहाना मान्यता देण्यात आली आहे तर विद्यार्थी संख्या ११२ आहे. बीड अठरा वस्तीगृहांना मान्यता देण्यात आली आहे तर विद्यार्थी संख्या ५६९ आहे. धारूर तालुक्यात ८० वस्तीगरांना मान्यता देण्यात आली आहे यामध्ये एकूण ९८०० विद्यार्थी संख्या आहे. गेवराई तालुक्यात १० वस्तीग्रह असून एकूण ७८४ विद्यार्थी संख्या आहे. माजलगाव तालुक्यात ३३ वस्तीग्रहणांना मान्यता देण्यात आली असून ३६३५ विद्यार्थी संख्या दर्शवण्यात आली आहे. केस तालुक्यात २९ वसतिगृहाची संख्या असून ३८६९ विद्यार्थ्यांना वस्तीगृहात समाविष्ट करण्यात आले आहे. तालुक्यात वस्तीगृहाला मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये ४५३ विद्यार्थी संख्या आहेत. शिरूर तालुक्याचे अवघे अवघ्या दोन शाळेचे प्रस्ताव आले आहेत यामध्ये १०७ विद्यार्थी संख्या आहे. वडवणी तालुक्यासाठी २१ शाळा व्यवस्थापन समितीच्या वस्तीग्रहणांना मान्यता देण्यात आली आहे या वस्तीगृहात १७५३ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

शाळा व्यवस्थापन समिती मार्फत चालविण्यात येत असलेल्या या वस्तीग्रहाची जबाबदारी अध्यक्ष मुख्याध्यापक यांच्यावर आहे. तथापि शाळा व्यवस्थापन शाळा व्यवस्थापन समितीचे सचिव तथा मुख्याध्यापक हे प्रत्येक शिक्षकावर वस्तीगृहाच्या भोजनाची व्यवस्था पाहण्याची जबाबदारी दिली जाते.

### अधिकारी वसतिगृहांना भेटी देणार

जिल्ह्यात सुरू करण्यात आलेल्या वस्तीगृह नियमाप्रमाणे चालवावे. स्थलांतरित ऊसतोड कामगाराच्या पाल्यांना दर्जेदार जेवन मिळावे, यासाठी गटशिक्षणाधिकारी यांना आदेश देण्यात आले आहेत. दैनंदिन हजेरी, जेवणाचा दर्जा, विद्यार्थी जेवतांनाचे फोटो आणि अहवाल दररोज सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी आणि जिल्हास्तरीय अधिकारी या वसतीगृहांना नियमित भेटी देणार असल्याचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी म्हटले आहे.

# चांद शेखसह भाजपा कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात (अजित पवार गट) प्रवेश

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड जिल्हा परिषद गटातील भाजपाचे निष्ठावंत कार्यकर्ते चांद शेख यांच्यासह भाजपा कार्यकर्त्यांनी रविवारी राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प)पक्षात प्रवेश केला. भारतीय जनता पक्षात होणारी गळचेपी कारणीभूत असल्याची भावना यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.



भारतीय जनता पक्षाकडून २०१७ साली शेख चांद यांच्या स्वकीय देवई शिंदे यांनी दिंद्रुड जिल्हा परिषद गटातुन निवडणूक लढवली. अवघ्या १३८ मतांनी त्यावेळी त्यांना पराभव स्वीकारावा लागला. लोकनेते गोपीनाथ मुंडे यांचे जवळचे कार्यकर्ते व माजी आमदार आर.टी. देशमुख यांचे वर्गमित्र म्हणून शेख चांद यांची ओळख,मात्र गेल्या काही वर्षांपासून भाजपा पक्ष कार्यकर्त्यांना निवडणुकी व्यतिरिक्त जवळ करत नाही, कुठल्याही बाबतीत आपली विचारणा होत नाही, सामाजिक कार्य करतांना आपली व जनतेची काम होत नाहीत याला त्रस्त झाल्यामुळे आम्ही भाजपा पक्ष सोडून आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्याचे शेख चांद यांनी प्रसार माध्यमांसमोर व्यक्त केली आहे. शेख चांद यांच्यासह बंडू राठोड,नामदेव बोरचाटे, नवनाथ जाधव, भानुदास जाधव, संतोष पवार, सुशील धपाटे, अशोक भेटे, अमर कुरे, संजय सोनपसारे, सिद्धेश्वर कदम, स्वप्नील महागोविंद, लायक सय्यद या कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आमदार प्रकाशदादा सोळंके आपले पुनर्वसन करतील या अपेक्षेने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.कार्यकर्त्यांनी पक्षाला दिलेल्या सोडचिठ्ठीमुळे भारतीय जनता पक्षाचे मोठे नुकसान झाल्याची चर्चा दिंद्रुड जिल्हा परिषद गटात व्यक्त होताना दिसत आहे.

# नाफेडमार्फत सोयाबीन,मूग,उडीद शासकीय हमीभावाने खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी सुरू- सभापती तांबोळी

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय झाला असून लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नांमुळे कडा कृषी उत्पन्न बाजार समिती येथे नाफेड अंतर्गत आधारभूत किंमत खरेदी योजना २०२५-२६ सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत सोयाबीन, मूग व उडीद या पिकांची शासकीय हमीभावाने खरेदी होणार असून, शेतकऱ्यांसाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. नोंदणीची अंतिम तारीख ३१ डिसेंबर २०२५ असून, सर्व शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह आपली नोंदणी पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी यांनी केले आहे.





या खरेदी केंद्रात पिकांसाठी खालील प्रमाणे सोयाबीन ५३२८ प्रतिक्विंटल,उडीद ७८०० प्रतिक्विंटल, मूग ८७६८ प्रतिक्विंटल हमीभाव निश्चित करण्यात आला आहे.कडा कृषी उत्पन्न बाजार समितीअंतर्गत सेवा सहकारी सोसायटी लि.जामगाव ता. आष्टी या केंद्राला नाफेड अंतर्गत खरेदी केंद्र म्हणून मंजुरी मिळाली असून नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी खालील कागदपत्रांसह प्रत्यक्ष उपस्थित राहावे ७/१२ व ८अ उतारा (ई-पिक पाहणीसह), आधारकार्ड,बँक पासबुक चालू खाते, जनधन खाते स्वीकारले जाणार नाही, शेतकऱ्याचे नाव सातबारावर असणे आवश्यक असून शेतकऱ्यांने स्वतः कागदपत्रासह उपस्थित राहणे अनिवार्य आहे.दि.१५ नोव्हेंबर पासून प्रत्यक्ष खरेदी सुरू होणार असल्याची माहिती सचिव हनुमंत गळगटे यांनी दिली आहे.

कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी म्हणाले,शेतकऱ्यांना हमीभावाने उत्पादन विक्रीची संधी मिळत असल्याने दिलासा मिळणार आहे. शेतकऱ्यांनी वेळेत नोंदणी करून या योजनेचा लाभ घ्यावा.

## पान ६ वरून...

### आदर्श मुख्याध्यापक

अनेक विद्यार्थी प्रेरणा घेऊन मोठमोठ्या पदावर गेले आहेत.त्यांचेही शिक्षण क्षेत्रातील पवित्र सुगंधी कार्य असेच इतरांना प्रेरणादायी ठरावे या उद्देशाने त्यांचा सन्मान लोकशक्ती न्यूज नेटवर्कच्या माध्यमातून लोकशक्ती महाराष्ट्र गौरव पुरस्कार सन्मान प्रदान करून करण्यात येणार आहे.

मुख्याध्यापक साईनाथ कारभारी बोडखे यांच्या या पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल आष्टी तालुक्यातील तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध शिक्षण क्षेत्रातील मान्यवर व सामाजिक सांस्कृतिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्याकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

### शेवगाव येथील वकिलांवरील

जाधव ॲड. एस. बी. कोकाटे, ॲड. अमरीश वैद्य, ॲड. सिताराम नागरगोजे, ॲड शिवाजी कोल्हे ॲड. ऋषिकेश डबीर, ॲड. अविनाश जगदाळे, ॲड. चंदन कांकरिया, ॲड. भागवत नागरगोजे, ॲड. महेश बेदरे, ॲड. सुधीर एकबोटे, ॲड. आशरफ सय्यद, ॲड. तुषार जाधव, ॲड. सुशील कोठेकर, घुले ॲड. सुधीर घुमरे, तसेच महिला प्रतिनिधी ॲड. श्वेता राख आणि ॲड. शैलजा गर्जे यांच्यासह संघाचे सर्व पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राष्ट्रीय महामार्ग शंभरचिरा ते

वाहनांसाठी हा धोका ठरू लागला आहे. तालुक्यातील येवलवाडी फाटा येथे चुंबळी फाटा दरम्यान काळ्या मातीतून दुचाकी व चारचाकी वाहने

चालवण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे.

चुंबळी फाटा ते सौताडा दरम्यान हा रस्ता धोकादायक बनला आहे. याठिकाणी चिखल तयार होत असल्याने गाड्यांच्या लांबच लांब रांगा लागत असून, वाहनांचे अपघातही होत आहेत.

पाटोदा-साकत मार्गावर डांबराचा एक थर झाला होता. परंतु, अतिवृष्टीमुळे तोही थर उखडला आहे. त्यामुळे याठिकाणी पुन्हा डांबरीकरण करावे लागणार आहे. डोंगरकिन्हीमार्गे अहिल्यानगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर सततच्या पावसामुळे मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे अहिल्यानगरकडे जाताना वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यामुळे रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी होत आहे.येवलवाडी ते चुंबळी फाट्यादरम्यान महामार्गावर चिखल झाला आहे. त्यामुळे वाहने घसरत आहेत तर पाटोदा-साकत मार्गावरील डांबर खरडून गेले आहे.

### तेलगाव-माजलगाव

कारवाई का होत नाही?

आमदार साहेब सदरील रस्त्याच्या गुत्तेदाराचे कान कधी टोचणार?

विकासकामांवर लाखो-करोडो रुपये खर्च होत असताना, प्रत्यक्षात मात्र नागरिकांना त्रासच सहन करावा लागत आहे. प्रशासन व जनप्रतिनिधींनी तातडीने लक्ष घालून गुत्तेदाराला जबाबदारीचे भान करून द्यावे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वाढलेली झुडपे, खड्डे आणि दुर्लक्षित साफसफाईमुळे या मार्गावरून प्रवास करणे धोक्याचे बनले आहे. प्रवासी तसेच ग्रामस्थांचा प्रश्न आहे की, काम पूर्ण झाल्यानंतर देखरेख न करणाऱ्या गुत्तेदारावर कारवाई का होत नाही?

# हरित माजलगावमुळे शहराच्या सौंदर्यात भर पडली -लाटे



## मोहिमेच्या तिसऱ्या दिवशी २१ झाडांचे रोपण

माजलगाव । प्रतिनिधी

रोटरी क्लब माजलगाव सेंट्रल व शहरातील पत्रकार बांधवानी पुढाकार घेऊन हरित माजलगाव हा महत्वाकांक्षी प्रकल्प राबवल्यामुळे आज माजलगाव शहराच्या मुख्य रस्त्यावर हिरवळ सजली आहे या वृक्षारोपण मोहिमेत मागील वर्षी मुख्य रस्त्यावर लावलेली सर्व झाडे आज माजलगावच्या सौंदर्यात भर पाडत आहेत असे मत सामाजिक कार्यकर्ते व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते अच्युत लाटे यांनी व्यक्त केले आहे.

मागील वर्षीच्या यशस्वी वृक्षारोपण मोहिमेनंतर या वर्षीही रोटरी क्लब माजलगाव सेंट्रल ही मोहीम राबवत आहे या वर्षी शहरातील धारूररोड या मुख्यरस्त्याच्या ०१ कि.मी.अंतरावर रस्त्याच्या मध्यभागी १११ झाडांचे ट्री गार्ड सह वृक्षारोपण करत आहे,रोटरी क्लब राबवत असलेल्या वृक्षारोपण मोहिमेच्या दि ०३: नोव्हेंबर सोमवार रोजी तिसऱ्या दिवशी धारूर रोडवर या प्रभागातील कार्यकर्ते सय्यद लतीफ दिवाण यांचे हस्ते २१ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अच्युतराव लाटे बोलत होते.या दोघांनीही रोपण केलेल्या २१ झाडांचे दायित्व स्वीकारले आहे.या वेळी रोटरी क्लब माजलगाव सेंट्रलचे अध्यक्ष रो. विनोद जाधव, सचिव कैलास येलशेट्टे,डॉ.भारत वाघमोडे,शरद यादव,चेअरमन प्रोजेक्टर रो.इम्रान नाईक व रो. उमाकांत सोळंके यांची प्रमुख उपस्थिती होती.वर्षभर टँकरने पाणी देणार रोटरी क्लब ने लावलेल्या या सर्व झाडांना वर्षभर टँकरने पाणी देऊन झाडांना वाचवण्याची हमी यावेळी माजी नगरसेवक शरद यादव यांनी घेतली.

या वृक्षारोपण मोहिमेत इंजि. गजेंद्र खोत, इंजि.कृष्णा सोळंके,वसंत पाटील,उमाकांत सोळंके,विनोद जाधव,प्रा.प्रताप धपाटे,यूसुफ़ इसाक आत्तार,धारक अंगद,शेख रहीम शाह शेख तौफीक,नाहेद शेख शेख इकरार, अंकुशराव डाके, काटकर,भगवान, लाटे इत्यादीनी या मोहिमेत हिरारीने भाग घेतला.

# आ.धस यांच्या पाठपुराव्यामुळे वयोवृद्ध द्रोपदाबाईंना मिळाला जीवनदायी आधार

पाटोदा । प्रतिनिधी

रुपुर या गावातील ग वयोवृद्ध द्रोपदाबाई धमी भुंबे यांना मेंदूचा गंभीर आजार झाला होता. उपचारासाठी प्रचंड खर्च आवश्यक असल्याने त्यांचे शेतकरी कुटुंब पूर्णतः हतबल झाले होते. अशा संकटाच्या काळात कुटुंबीयांनी ही माहिती आमदार सुरेश धस यांना दिल्यानंतर आमदार सुरेश धस यांनी पुढाकार घेत, मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून ₹१,००,०००/- (एक लाख रुपये) इतके अर्थसहाय्य मंजूर करून दिले त्यामुळे द्रोपदायी यांना मोठा जीवनदायी आधार मिळाला आहे.



द्रोपदाबाई भुंबे या अहमदनगर येथील ''मॅक्सक्योर स्पेशालिटी हॉस्पिटल'' येथे उपचार घेत होत्या. त्यांच्या वैद्यकीय खर्चासाठी आर्थिक मदत मिळावी म्हणून आमदार सुरेश धस यांनी वैयक्तिक पाठपुरावा करत मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे अर्ज सादर केला. त्यावर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाने मंजुरी मिळाली असून, ही रक्कम थेट द्रोपदाबाई यांच्या रुग्णालयाच्या खात्यात जमा करण्यात आली आहे.या मदतीमुळे योग्य वेळी उपचार होऊन द्रोपदाबाईंचे प्राण वाचले, असे त्यांच्या डॉक्टरांनीही सांगितले आहे.

# दौलावडगाव येथे ३३/११ केव्ही उपकेंद्रासाठी ५ एसएमव्हीएचा नवीन ट्रान्सफॉर्मर मंजूर

## आ. सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला यश

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील दौलावडगाव परिसरातील शेतकऱ्यांना दिलासा देणारी आनंदाची बातमी समोर आली आहे. मतदारसंघाचे लोकनेते आ. सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण आणि ठाम पाठपुराव्याला यश मिळाले असून मुख्यमंत्री सौर कृषी वीज वाहिनी २.० या योजनेअंतर्गत ३३/११ के.व्ही. उपकेंद्र दौलावडगाव येथे ५ एसएमव्हीएचा नवीन ट्रान्सफॉर्मर मंजूर करण्यात आला आहे.



या मंजुरीमुळे गेल्या अनेक वर्षांपासून कमी व्होल्टेजच्या समस्येमुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांना आता दिलासा मिळणार आहे. या उपकेंद्राच्या माध्यमातून परिसरातील दौलावडगाव,सालेवडगाव,अंभोरा,पिंपळगाव घाट, आंबेवाडी, बांदखेल, केळ, हरेवाडी आणि मराठवाडी या गावांतील शेतकऱ्यांच्या शेतीपंपांना उच्च दाबाने, सुरळीत व स्थिर वीजपुरवठा होणार आहे.गेल्या काही वर्षांपासून या भागात शेतीपंपांना योग्य दाबाने वीज न मिळाल्याने शेतकऱ्यांना रात्री-अपरात्री पाणी पाजण्यासाठी त्रास सहन करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर आ. धस यांनी सातत्याने शासनस्तरावर, ऊर्जा विभाग व महावितरण अधिकाऱ्यांशी चर्चा करत या समस्येवर उपाय करण्याची सततच्या मागणीला पाठपुराव्याला अखेर शासनाने या अतिरिक्त ट्रान्सफॉर्मरच्या मंजुरीला हिरवा कंदील दाखवला असून यामुळे हजारो एकर शेतीला फायदा होणार आहे. या निर्णयामुळे दौलवडगाव परिसरातील शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून झाले परिसरातील ग्रामस्थांनी आ. सुरेश धस यांच्या प्रयत्नाने आमच्या शेतीला उजेड मिळाला आहे अशा शब्दांत आपली कृतज्ञता व्यक्त केली आहे.

# कार्तिक शुद्ध पौर्णिमेनिमित्त श्री दत्त संस्थान येथे भव्य उत्सव सोहळा

बीड । प्रतिनिधी

त्रिकाल वंदनीय परमपूज्य गुरुवर्य श्री. ष.ब्र.१०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलूरकर यांच्या कृपाशिर्वादाने व दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री दत्त संस्थान, बालाघाट (कपिलधारवाडी-मांजरसुंबा) येथे बुधवार, दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी कार्तिक शुद्ध पौर्णिमेनिमित्त भव्य उत्सव सोहळा आयोजित करण्यात आला आहे.



हा उत्सव भक्तीभावाने आणि मोठ्या उत्साहात साजरा होणार असून, सकाळी पहाटे महापूजा, अभिषेक, आरती व नामस्मरण कार्यक्रमाने सोहळ्याची सुरुवात होईल.

दुपारी सर्व उपस्थित भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील सर्व श्रद्धाळू भक्तांना या पवित्र कार्तिक शुद्ध पौर्णिमा उत्सवाला उपस्थित राहून श्री दत्त महाराजांच्या कृपाशिर्वादाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या धार्मिक सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी अन्नदाते म्हणून विक्रम माणिक वाघिरे, बंकट श्रीहरी वाघिरे आणि धर्मा दिनानाथ जगताप उदंडवडगाव (शिवाजीनगर) यांचे विशेष योगदान आहे.उत्सवाच्या तयारीसाठी स्थानिकग्रामस्थ आणि श्रद्धाळू भक्त वर्ग उत्साहाने कार्यरत असून, परिसर भक्तिरसाने ओतप्रोत भरून गेला आहे.

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-८९४ दिनांक-२७/१०/२०२५

### जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती गोपाल बाबासाहेब जाधव रा. राहुवाडी ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत: जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | गोपाल बाबासाहेब जाधव | स्वत: | १८/०७/२००५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# शेतकऱ्यांसाठीच्या सलोखा योजनेला मुदतवाढ

पुंणे : मिनीचा ताबा व वहिवाटीबाबत शेतकऱ्यांतील आपापसांतील वाद मिटविण्यासाठी असलेल्या सलोखा योजनेला १ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

नाममात्र एक हजार रुपये नोंदणी शुल्क आणि एक हजार रुपये मुद्रांक शुल्काच्या बदल्यात शेतकऱ्यांना आपल्या ताब्यातील शेतजमिनीची अदलाबदल करण्याची संधी या योजनेद्वारे उपलब्ध करून दिली आहे. त्यानुसार मागील अडीच वर्षांत राज्यात एकूण १ हजार ३०३ दस्त नोंदविले गेले.

या योजनेमुळे या दस्तांना एकूण मुद्रांक शुल्कात १० कोटी ७५ लाख रुपयांची, तर नोंदणी फीमध्ये १ कोटी ६५ हजार रुपयांची माफी देण्यात आली. सलोखा योजनेमुळे १ हजार ३०३ दस्तांना एकूण १२ कोटी ४० लाख रुपयांची माफी मिळाली आहे. एका शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा दुसऱ्या शेतकऱ्याकडे व दुसऱ्या शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे असणाऱ्या शेतजमीनधारकांच्या अदलाबदल




दस्तांसाठी सवलत देणारी ही योजना राबविण्यात आली. शेतजमिनीचे वाद हे अत्यंत क्लिष्ट स्वरूपाचे व गुंतागुंतीचे असल्याने न्यायालयातील व प्रशासनातील पुरेशा यंत्रणेअभावी हे वाद वर्षानुवर्षे चालू आहेत. शेतजमीन हा प्रत्येकाचा जिव्हाळ्याचा व संवेदनशील विषय असल्यामुळे त्यातील वादांमुळे कौटुंबिक नात्यांमध्ये दुरावा निर्माण झाला आहे. या वादांमुळे अनेक पिढ्यांचे नुकसान झाले असून, आजच्या पिढीचाही खर्च व वेळेचा अपव्यय होत आहे. या पार्श्वभूमीवर वाद संपून समाजामध्ये सलोखा निर्माण व्हावा व एकमेकांतील सौख्य, शांतता व सौहार्द वाढीस लागावे, यासाठी शासनाने सलोखा योजना जानेवारी २०२३ मध्ये आणली. आता राज्य शासनाने या योजनेस पुन्हा मुदतवाढ दिली आहे.

सलोखा योजनेच्या अटी

शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे किमान १२ वर्षांपासून असला पाहिजे. अकृषिक, रहिवासी, तसेच वाणिज्यिक वापराच्या जमिनींसाठी ही योजना नाही. दोन्ही पक्षकारांनी सर्वसंमतीने हा अदलाबदल दस्त नोंदवित आहे, अशी प्रकारची अट दस्तामध्ये समाविष्ट करणे आवश्यक. वस्तुस्थितिदर्शक पंचनामा मंडल अधिकारी व तलाठी नोंदवून घेणार असून पंचनामा प्रमाणपत्र शेतकऱ्यांना दिले जाणार आहे. पंचनामा प्रमाणपत्र अदलाबदल दस्तास जोडणे आवश्यक.

## या आहेत लिंबाच्या 'टॉप जाती'



शेतकरी बंधुंनो, तुम्ही जर शेतात लिंबाची लागवड करायचा विचार करत असाल तर तुम्हाला लिंबाच्या 'टॉप जाती' माहित असण्याची गरज आहे.

लिंबामध्ये दोन प्रकार आहेत एक लाईम म्हणजेच पातळ सालीचे लिंबू आणि दुसरा प्रकार लेमन म्हणजेच जाड सालीचे लिंबू. महाराष्ट्र राज्यात कागदी लिंबाच्या फळांना जास्त मागणी असल्यामुळे त्यांची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. लेमनची फळे लोणच्यासाठी चांगली असतात.

कागदी लिंबामध्ये स्थानिक जातीपासून लागवड झालेली झाडे मोठ्या प्रमाणावर आढळतात अधिक उत्पादन देणार्या फळांची उत्तम प्रत असलेल्या जाती आता प्रसारित करण्यात आलेल्या आहेत. त्यांची निवड करणे शेतकऱ्यांना जास्त फायद्याचे ठरते. त्यापैकी काही जाती जसे प्रमालीनी, विक्रम, साई शरबती, यांचे गुणधम अधिक चांगले आहेत.

प्रमालिनी : स्थानिक जातीपेक्षा ३५ ते ३९ टक्के जास्त उत्पादन देणारी. फळधारणा घोसात (गुच्छात ३ ते ७ फळे). फळधारणा जून-जुलै व नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये होते. रसाचे प्रमाण ५७ टक्के.

विक्रम : स्थनिक जातीपेक्षा ३० ते ३२ टक्के उत्पादन जास्त. फळे ५ ते १० गुच्छात येतात. फळ साधारण जून-जुलै, नोव्हेंबर-डिसेंबर व नेहमीच्या हंगामा व्यतिरिक्त होते व उन्हाळ्यात फळे मिळतात.

साई शरबती : पश्चिम महाराष्ट्रातील स्थानिक जातीपासून निवड पद्धतीने जात विकसीत केली आहे. फळे नियमित आकाराची जास्त विद्राव्य पदार्थ व आम्लता असलेली व अधिक उत्पादन देणारी जात. उन्हाळ्यात २५ टक्के जास्त उत्पादन देणारी. रसाचे प्रमाण ५५ टक्के. खैऱ्या रोगास प्रतिकारक.

## पिकांच्या वेगवेगळ्या अवस्थेत 'असा' करा ट्रायकोडर्माचा वापर

सेंद्रिय शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे तसेच प्रगतशील देशांमध्ये सेंद्रिय शेतीमधील उत्पादनास चांगली मागणी आहे. पिकांवर रोगांचे नियंत्रण करण्याकरिता ट्रायकोडर्मा एक प्रभावी रोग नियंत्रक बुरशी आहे आणि तिचा वापर आपण जैविक शेतीमध्ये रोग नियंत्रणासाठी करू शकतो. अलिकडे रासायनिक बुरशीनाशकाला पर्याय म्हणून ट्रायकोडर्माचा वापर होऊ लागला आहे.

ट्रायकोडर्माचा वापर जमिनीत वास्तवास असणाऱ्या रोगकारक बुरशी जसे फ्युजॅरियम, रायझोक्टोनिया, स्क्लेरोशियम आणि पिथीयम मुळे उद्भवणारे रोग जसे मर, मुळकूज, खोडकुज तसेच काही बियाण्या द्वारे पसरणाऱ्या रोगांच्या नियंत्रणासाठी करता येतो.

ट्रायकोडर्मा कार्य कसे करते? : ट्रायकोडर्मा अपायकारक बुरशीच्या धाग्यांमध्ये विळखा घालून आपले साम्राज्य पसरविते व नंतर या धाग्यांमध्ये छिद्र करून त्यातील पोषक अन्नद्रव्ये शोषून घेते त्यामुळे अपायकारक बुरशीचा विस्तार थांबतो. ट्रायकोडर्मा अपायकारक बुरशीला मारक ठरणारे व्हिरीडी हे प्रतिजैवक सुद्धा तयार करते. अपायकारक बुरशीपेक्षा ट्रायकोडर्माची वाढ लवकर होते त्यामुळे ट्रायकोडर्मा ही बुरशी अन्नद्रव्यांसाठी अपायकारक बुरशी बरोबर प्रतिस्पर्धा करून अपायकारक बुरशीच्या वाढीसाठी लागणारे कर्ब, नत्र, व्हिटॅमिन इत्यादी वापरून घेते त्यामुळे अपायकारक बुरशीची वाढ खुंटते.

ट्रायकोडर्माचा वापर : हल्ली ट्रायकोडर्माच्या दोन प्रजाती मुख्यतेकरून वापरण्यात येतात ट्रायकोडर्मा हरजीएनम आणि ट्रायकोडर्मा व्हिरीडी. या बुरशीचे संवर्धन २५० ग्रॅम आणि एक किलो पाकिटाच्या स्वरुपात बाजारात मिळते. प्रामुख्याने ट्रायकोडर्माचा वापर बीज प्रक्रिया, रोपांची प्रक्रिया आणि मातीची प्रक्रिया करण्यासाठी केला जातो.

बीज प्रक्रिया : पेरणीच्या वेळी बियाण्यावर पाणी शिंपडून १ किलो बियाणे ३ ग्रॅम ट्रायकोडर्मा सोबत व्यवस्थितपणे मिसळावे. प्रक्रिया केलेले बियाणे सावलीत वाळवून लगेच पेरणी करावी.

रोपांची प्रक्रिया : ज्या पिकांची लागवड रोपे तयार करून केली जाते त्या पिकांमध्ये लागवडीपूर्वी रोपांची मुळे ट्रायकोडर्मा भुकटी ५०० ग्रॅम, ५ लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात ५ मिनिटांसाठी बुडवून ठेवावीत व नंतर त्यांची लागवड करावी.

मातीची प्रक्रिया : मातीची प्रक्रिया करताना १ ते १.५ किलो ट्रायकोडर्मा २५ ते ३० किलो चांगल्या कुजलेल्या शेणखतात मिसळून १ हेक्टर शेतातील मातीत मिसळावे व शक्य असल्यास पाणी द्यावे.

फवारणी : पानावरील बुरशीजन्य रोगांच्या नियंत्रणाकरिता कृषी विद्यापीठांनी विशिष्ट रोगांकरिता केलेल्या शिफारशींचा अवलंब करून फवारणी करावी.

ट्रायकोडर्माचा प्रभावी वापर होण्यासाठी : पाण्याचा व्यवस्थित निचरा होणार्या जमिनीत ट्रायकोडर्माची वाढ जोमाने होते म्हणून जास्त ओलीत करू नये. जमिनीत सेंद्रिय पदार्थ असल्यास ट्रायकोडर्माची वाढ चांगली होते त्याकरिता शेतात चांगले कुजलेले शेणखत टाकावे. ट्रायकोडर्मा बुरशीचे पाकिट/ द्रावण जास्त काळ न ठेवता लवकरात लवकर वापरावे तसेच वापर होईपर्यंत त्यांना सूर्यप्रकाशापासून दूर थंड ठिकाणी ठेवावे. बियाण्यांच्या प्रक्रियेकरिता ट्रायकोडर्मा सोबत रायझोबियम, ॲझोटोबॅक्टर आणि स्फुरद विरघळणारे जीवाणू इत्यादी जैविक खतांचा वापर करता येतो.



## दिन विशेष




### महत्वाच्या घटना

१८१७ : इंग्रज व दुसरे बाजीराव यांच्या लढाईत इंग्रजांकडून बाजीरावाच्या सैन्याचा पराभव झाला.
१८२४ : अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरात जगातील पहिले अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू झाले.
१८४३ : विष्णुदास अमृत भावे स्वरचित सीता स्वयंवर या मराठीतील पहिल्या नाटकाचा पहिला प्रयोग सांगली येथे सदर केला.
१८७२ : महिलांना मतदानाचा अधिकार नसताना अमेरिकेत सुसान अँथनी या महिलेने मतदान केल्यामुळे तिला १०० डॉलर दंड करण्यात आला.
१८९५ : जॉर्ज बी. सेल्डेन यांना ऑटोमोबाइलसाठी पहिले अमेरिकेचे पेटंट भेटले.
१९२९ : जी. आय. पी. रेल्वे कंपनीने मुंबईहून पुण्यापर्यंतच्या लोहमार्गावरून आगगाड्याऐवजी विजेवर चालणा-या गाड्यांचा प्रारंभ केला.
१९४० : फ्रँकलिन डी. रूझवेल्ट हे तिसऱ्यांदा निवडून आलेले. एकमेव राष्ट्रपती आहेत.
१९४५ : कोलंबियाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.
१९५१ : बी. बी. सी. आय.रेल्वे आणि सौराष्ट्र रेल्वे, राजपुताना रेल्वे, जयपूर रेल्वे व कच्छ रेल्वे यांचे विलिणीकरण करुन पश्चिम रेल्वे ची स्थापना करण्यात आली.
२००६ : इराकचे माजी अध्यक्ष सद्दाम हुसेन यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली.
२००७ : गुगलने ने ॲडरॉइड मोबाइल ऑपरेटिंग सिस्टमचे अनावरण केले.
२०१३ : भारताने मंगळ ऑर्बिटर मोहिमेची सुरूवात केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७० : स्वातंत्र्य चळवळीतील नेते चित्तरंजन दास यांचा जन्म. (मृत्यू: १६ जून १९२५)
१८८५ : अमेरिकन इतिहासकार व तत्त्वज्ञ विल डुरांट यांचा जन्म. (मृत्यू: ७ नोव्हेंबर १९८१)
१८९२ : इंग्रजी-भारतीय अनुवांशिक आणि जीवशास्त्रज्ञ जे. बी. एस. हलदाणे यांचा जन्म. (मृत्यू: १ डिसेंबर १९६४)
१९०५ : भारतीय लेखक आणि कवी सज्जनद झहीर यांचा जन्म. (मृत्यू: १३ सप्टेंबर १९७३)
१९०८ : तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक व लेखक, साहित्य अकादमी पुरस्कार विजेते प्रा. राजा राव यांचा जन्म. (मृत्यू: ८ जुलै २००६ ऑस्टिन, न्यू जर्सी, यु. एस. ए.)
१९१३ : ब्रिटिश अभिनेत्री विवियन लेह यांचा जन्म. (मृत्यू: ८ जुलै १९६७)
१९१७ : स्वातंत्र्यसैनिक व हरयाणाचे मुख्यमंत्री बनारसी दास गुप्ता यांचा जन्म. (मृत्यू: २९ ऑगस्ट २००७)
१९२१ : ललित कलादर्श ह्या नाट्यसंस्थेचे प्रमुख व संगीत नाटक कलावंत व गायक भालचंद्र पेंढारकर यांचा जन्म.
१९२९ : गीतकार व सर्जनशील कवी प्रा. योगेश्वर अभ्यंकर यांचा जन्म. (मृत्यू: १४ नोव्हेंबर २०००)
१९३० : भारतीय नेते अर्जुनसिंह यांचा जन्म. (मृत्यू: ४ मार्च २०११)
१९३२ : पक्षी, वन्याजीवनविषयक ग्रंथकार मारुती चितमपल्ली यांचा सोलापूर येथे जन्म.
१९५२ : भारतीय तत्त्ववेत्ता आणि लेखक वंदना शिवा यांचा जन्म.
१९५५ : पत्रकार करन थापर यांचा जन्म.
१९८८ : क्रिकेटपटू विराट कोहोली यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७९ : प्रकाश हा विद्युत चुंबकीय तरंगांनी बनलेला असतो असा सिद्धांत मांडणारे ब्रिटिश पदार्थवैज्ञानिक व गणितज्ञ जेम्स क्लार्क मॅक्सवेल यांचे निधन. (जन्म: १३ जून १८३१ एडिंबर्ग, यु. के.)
१९१५ : राष्ट्रीय सभेचे संस्थापक व मुंबईचा सिंह उर्फ फिरोजशहा मेरवानजी मेहता यांचे निधन. (जन्म: ४ ऑगस्ट १८४५)
१९५० : चतुरंग गवई फय्याझ खाँसाहेब यांचे निधन.
१९९१ : कथालेखिका व कादंबरीकार शकुंतला विष्णू गोगटे यांचे निधन.
२०११ : संगीतकार व गायक भूपेन हजारिका यांचे निधन. (जन्म: ८ सप्टेंबर १९२६)

## दुधाला फॅट कमी लागण्याची कारणे

दुग्ध उत्पादन व्यवसायात दुधाला फॅट (स्निग्धांश), डिग्री (एस.एन.एफ) कमी लागल्यामुळे बरेच नुकसान होते, शासकीय नियमानुसार गाईच्या दुधास ३.५ व म्हशीच्या दुधास किमान ६ टक्के फॅट असणे आवश्यक आहे. यापेक्षा फॅटचे प्रमाण जास्त असल्यास वाढीव दर मिळतो, यापेक्षा कमी असल्यास दूध स्वीकारले जात नाही व असे दूध कमी दराने विकण्याशिवाय पर्या नसतो. परिणाम व्यवसाय तोट्यात जातो हीच परिस्थिती दुधास आवश्यकतेपेक्षा कमी डिग्री लागल्यास दुधाची अस्वीकृती होते. शासनाच्या कडक धोरणामुळे उत्पादकापुढे मोठे संकट उभे राहते व यावर मात करण्यासाठी विविध अनैसर्गिक मार्गांचा अवलंब अविचाराने सुरू होतो. परंतु याने फायद्याच्याऐवजी तोटाच होतो.

आनुवंशिकता : दुधास फॅट कमी लागण्याचे महत्त्वाचे पायाभूत कारण दुभत्या जनावराची आनुवंशिकता असून, दूध उत्पादन क्षमता आणि फॅटचे प्रमाण हे गुणधर्म गुणसूत्राद्वारे नियमित केले जातात. जनावराच्या वंशानुसार त्याच्या दुधातील फॅटचे प्रमाण बदलते. ज्या जातीपासून जास्त दूध उत्पादन मिळते त्या दुधात फॅटचे प्रमाण कमी आढळते व कमी दूध उत्पादन देणाऱ्या जातीमध्ये फॅटचे प्रमाण जास्त असते. म्हैसवंशीय जनावरांत फॅट ६ टक्के पेक्षा जास्त व गायवंशीय जनावरांच्या दुधात ४ टक्के फॅट असते. उत्तम आनुवंशिकता असणाऱ्या जनावरापासून त्यास उत्तम आहार, योग्य व्यवस्थापन व निरोगीपणा राखल्यास त्याच्यापासून जास्त फॅटचे दूध मिळविणे उत्पादकास शक्य आहे. गुणसूत्र शास्त्रानुसार कोणत्याही अपत्यात त्याची आई व बापापासून ५० टक्के प्रमाणे गुण येतात. जर एखाद्या गाईची आनुवंशिक क्षमता ३.५% फॅटची असेल तर कोणत्याही उपायाने तिच्यापासून त्यापेक्षा जास्त फॅट असणारे दूध मिळत नाही. चांगली वंशावळ असलेल्या देशी गाईमध्ये फॅटचे प्रमाण ४% च्या पुढे असते. जर्सी, संकरीत गाईच्या दुधात ५% तर होल्स्टीन फ्रिजीशियन गाईच्या दुधात ३ ते ३.५% एवढ्या कमी प्रमाणात फॅट असते. वंशावळीप्रमाणे दूधात फॅटचे प्रमाण असते. यात कोणत्याही उपायाने तिच्यापासून त्यापेक्षा जास्त फॅट असणारे दूध मिळत नाही. मात्र विविध कारणांनी तिच्या दुधातील फॅटचे प्रमाण त्यापेक्षा कमी होते म्हणून आनुवंशिक क्षमतेपेक्षा फॅट कमी होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे व यासाठी मात्र काही बाबींवर लक्ष देणे आवश्यक आहे.

दुभत्या जनावराचा आहार : बरेच पशुपालक आपल्याकडे उपलब्ध असलेला जो चारा असेल तो जनावरास खाऊ घालतात; परंतु दैनंदिन आहारात फक्त हिरवा चारा दिल्यास जनावरापासून दूध जास्त निघते परंतु फॅटचे प्रमाण कमी मिळते म्हणून पावसाळ्यात दुधाळ जनावरांना बहुतांशी ओला चारा जास्त मिळत असल्यामुळे दुधातील फॅट कमी होते. त्यासाठी त्याच्या दैनंदिन आहारात वाळलेला चारा कमीत कमी ३ ते ४ किलो देणे आवश्यक आहे. तसे पाहता चाऱ्याचे नियोजन करून जनावरांना वर्षभर हिरवा व सुका चारा खाऊ घालावा व सोबत ढेप, चुनी, सरकी, मका



अशा प्रकारची प्रथिने व मेदयुक्त आहार द्यावा. दुधातील फॅटचे प्रमाण वाढविण्यासाठी ॲसिटिक आम्ल हा महत्त्वाचा घटक आहे आणि हे आम्ल तयार होण्यासाठी वाळलेल्या (सुक्या) चाऱ्यातील सेल्युलोज (तंतूमय पदार्थ महत्त्वाचे आहे. त्यासाठी गाई, म्हशींना दुधातील जनावरांना हिरव्या चाऱ्यासोबत सुका चारा देणे गरजेचे आहे. जनावराच्या आहारात उसाचा अतिरेकी वापर टाळावा. कारण जनावराच्या आहारात साखरेचे प्रमाण वाढते तर दुधातील फॅट (स्निग्धांश ) च्या प्रमाणावर त्याचा विपरीत परिणाम होतो तसेच खाद्यातील स्निग्ध पदार्थांचे प्रमाण वाढल्यास पचन क्षमतेवर वाईट परिणाम होऊन दुधातील प्रथिनांमध्ये घट येते. वाळलेल्या चाऱ्यामुळे अन्नपचनाची क्रिया चांगली होते तसेच त्यामध्ये दुधातील फॅट तयार होण्यासाठी आवश्यक असणारे तंतूमय घटक भरपूर प्रमाणात असतात. म्हणून तो दिल्यास दुधातील फॅट वाढते तसेच जास्त प्रमाणात दिल्यास फॅटचे प्रमाणात पशुखाद्य आणि पचनाचे तंतूमय पदार्थ असणारी हिरवी वैरण कमी प्रमाणात दिल्यास फॅटचे प्रमाण कमी होते आणि डिग्रीचे (एस.एन.एफ) चे प्रमाण वाढते.

दुधातील फॅट (स्निग्धांश ) वाढण्यासाठी उपाय : दुधाळ जनावराच्या आहारात तेलबियांची पेंड उदा. सरकी ढेप, सरकी, शेंगदाणा पेंड, सोयाबीन पेंड, खाण्याचा सोडा, तेल, तूप आणि बायपास फॅट असणारे खाद्य दिल्यास त्यांच्या दुधातील फॅटचे प्रमाण तात्पुरते वाढते. आंबाडीचा भरडा + तिळाचे तेल ५० मि.ली. + गूळ २५० ग्रॅम दिल्यास फॅटचे, डिग्रीचे प्रमाण तर वाढतेच; परंतु दूध देण्याचे प्रमाणही वाढते व दूध देण्याच्या तक्रारीही उदा. पान्हा चोरणे, वासरू दगावल्यावर दूध न देणे या तक्रारीही कमी होऊन जनावरे दुधावर येतात असा अनुभव शेकडो जनावरांवर प्रयोग केल्यानंतर आला आहे. जनावराच्या आहारात अचानक बदल केल्याने दूध उत्पादनावर, फॅट व डिग्री कमी होण्यावर परिणाम होतो. म्हणून अचानक बदल टाळावेत. कुपोषण टाळावे.

दुधाळ जनावरांच्या आहारात उसाचे प्रमाण जास्त ठेवल्यास दुधातील फॅटचे प्रमाण कमी होते तसेच जनावराच्या आहारात प्रथिनांचे प्रमाण वाढल्यास दधातील फॅट कमी होते. ूध काढण्याच्या वेळेतील अंतर सर्वसाधारण पशुपालक सकाळी व सायंकाळी अशा दोन वेळेस गाई, म्हशीचे दूध काढतात. या दोन्ही दूध काढण्याच्या वेळेचा दूध उत्पादन व फॅटशी खूप जवळचा संबंध असतो. हे अंतर वाढल्यास दुधाचे प्रमाण वाढू शकेल; पण दुधातील फॅटचे प्रमाण कमी होते. दुधाची धार काढण्यापूर्वी कास चांगली स्वच्छ घुसळून धुवावी, जेणेकरून कासेच्या वरील भागातील दुधातील फॅटचे कण घुसळले जातील व दुधात उतरले जातील. कारण दूधनिर्मिती कासेत सतत कार्यान्वित असते व फॅट हा घटक हलका असल्याने कासेच्या वरच्या भागातील दुधात जास्त प्रमाणात असतो. दूध काढताना सुरुवातीच्या धारांमध्ये सर्वसाधारणपणे एक टक्के इतके फॅट असते तर शेवटच्या धारांपर्यंत संपूर्ण दूध काढावे कारण अपूर्ण दूध काढल्यास दूध निर्मिती प्रक्रियेवर विपरीत परिणाम होऊन दुधातील घटकांचे प्रमाण कमी होते म्हणून दूध पूर्णपणे ६ ते ७ मिनिटाच्या कालावधीत काढणे गरजेचे आहे. पूर्ण दूध काढलेतर दुधातील फॅटवर परिणाम होत नाही. पूर्ण धार नाही काढली तर कासेत दूध राहते व फॅट कमी होते. जनावराचे वय जसे वाढते तसतसे दुधातील फॅटचे प्रमाण कमी कमी होत असते. साधारणपणे ७ ते ८ वितांनंतर दुधातील फॅटचे प्रमाणात लक्षणीय घट होते. आपल्या कळपात ५ ते ९ वर्ष वयाच्या गाई किंवा म्हशी ठेवल्यास दूध उत्पादन चांगले मिळते व फॅटचे प्रमाणपण योग्य राहते. पावसाळ्यात, हिवाळ्यात हिरवा चारा मुबलक असल्याने जनावराचे दूध उत्पादन वाढते. आणि दुधातील फॅटचे प्रमाण कमी आढळते. याउलट उन्हाळ्यात कोरड्या वैरणीचा समावेश असल्याने दुधातील फॅट वाढलेले दिसून येते तसेच उन्हाळ्यात तापमानात जास्त वाढ झाल्यास जनावरे जास्त पाणी पितात व कमी चारा खातात अशा वेळी त्यांच्या शरीरातील तापमान वाढल्यामुळे दूध उत्पादन आणि फॅटचे प्रमाण कमी होते. शास्त्रीय नियमाने सर्वसाधारणपणे दूध वाढले की फॅटचे प्रमाण कमी होते तर दूध उत्पादन कमी झाले की दुधातील फॅट वाढते.

फॅट संदर्भात महत्वाच्या टिप्स :

१) जनावराच्या कासेतील संपूर्ण दूध काढल्यास फॅट जास्त निघते. अपूर्ण काढल्यास फॅट कमी लागते. २) विण्याचवेळी जनावराची प्रकृती उत्तम असल्यास भरपूर दूध व जास्त फॅट मिळते. ३) दूध काढतेवेळी कोणत्याही कारणाने जनावर घाबरल्यास दूध उत्पादन आणि फॅटचे प्रमाण घटते. ४) दोन वेळा धार काढण्यामागील कालावधी वाढल्यास दूध जास्त मिळते; परंतु फॅटचे प्रमाण कमी होते व कालावधी कमी झाल्यास दूध उत्पादन कमी होऊन फॅटचे प्रमाण वाढते. यासाठी दूध काढण्याच्या वेळांत समान अंतर ठेवावे.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनो सज्ज व्हा-पंडितराव भुतेकर

अंबड । प्रतिनिधी

आगामी जिल्हा परिषद ,पंचायत समिती व नगरपरिषद निवडणुकीसाठी पदाधिकारी व शिवसैनिकांनी तळगळात जाऊन गतीने कामास लागावे अशा सूचना शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर यांनी आज दिल्या.निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पूर्वतयारीसाठी सरस्वती लॉन्स येथे रविवारी ( ता.०२) शिवसेनेची बैठक संपन्न झाली .यावेळी पंडितराव भुतेकर युवासेना सचिव अभिमन्यू भाऊसाहेब घुगे, दलित .भास्करराव मगरे, बाबासाहेब इंगळे, भाऊसाहेब पाऊलबुद्धे रावसाहेब पवार ,जिल्हा संघटक संतोष जेधे, शिवाजी जऱ्हाड , बाळासाहेब इंगळे, बागू नाईक राठोड ,संभाजी उबाळे, बाजार समितीचे संचालक पंजाबराव जऱ्हाड, राहुल खरात यांची प्रमुख उपस्थिती होती.

## अंबड मध्ये शिवसेनेची आढावा बैठक



भुतेकर पुढे म्हणाले ,अंबड तालुक्यात एकेकाळी शिवसेनेचे चार जिल्हा परिषद सदस्य ,आठ ते दहा नगरसेवक निवडून आले होते. विद्यमान स्थितीत उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे ,उपनेते आ. अर्जुनराव खोतकर यांच्या आदेशानुसार महायुतीत निवडणुका लढवून जिंकायचे आहेत ,असे सांगून अंबड तालुक्यात शिवसेनेची मोठी ताकद असून कडवट शिवसैनिक आगामी निवडणुकीत विजय खेचून आणतील असा विश्वास भुतेकर यांनी व्यक्त केला. ॲड .भास्करराव मगरे, रावसाहेब पवार , संतोष जेधे, शिवाजी जऱ्हाड , बाळासाहेब इंगळे,बागू नाईक राठोड यांची यावेळी समायोचित भाषणे झाली.बैठकीस विभाग प्रमुख सिताराम काने, मुस्तकीम पटेल ,महेश रायकर, बाबासाहेब वैराळ, राहुल खरात, परमेश्वर गाडेकर यांच्यासह शिवसेना, युवासेना ,दलित आघाडी, महिला आघाडी चे पदाधिकारी व शिवसैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

महायुतीमध्ये मित्र पक्षाकडून शिवसेनेला सन्मान जनक जागा मिळतील असा विश्वास युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर यांनी याप्रसंगी व्यक्त केला तथापि अंबडसह भोकरदन, परतुर नगरपरिषदांमध्ये शिवसेनेला घटक पक्ष म्हणून योग्य त्या सन्मानजनक मिळण्यासाठी वरिष्ठ नेते मंडळी प्रयत्नशील राहतील असे अभिमन्यू खोतकर यांनी याप्रसंगी सांगितले. नगरपरिषदांमध्ये सन्मान जनक जागा न मिळाल्यास स्वबळावर लढाईसाठी तयार राहा असे आवाहनही अभिमन्यू खोतकर यांनी केले. शिवसेना -भाजप -राष्ट्रवादी काँग्रेस एकत्रितपणे महायुतीत निवडणूक लढविण्याचे आदेश उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी दिले असून त्यानुसार उपनेते ,आ. अर्जुनराव खोतकर यांच्या सूचनेप्रमाणे युतीसाठी शिवसेनेने एक पाऊल पुढे टाकत मित्र पक्षासोबत युती करण्याचे पत्र दिले असून शिवसेनेची भूमिका ही सकारात्मक असल्याचे कार्यकर्ते यांनी याप्रसंगी स्पष्ट केले. तथापि मित्र पक्षाकडून जिल्हा परिषदेत युतीसाठी संकेत दिसत असतांना नगरपरिषदांमध्ये स्वबळाची तयारी दिसते , असे सांगून शिवसेनेला सन्मान जनक वागणूक न मिळाल्यास स्वबळावर नगरपरिषदा निवडणूक लढविण्याची शिवसेनेची तयारी असल्याचे बोलल्या जात आहे

## जाहिरातबाजी भोवली; विद्रुपीकरण करणाऱ्यावर गुन्हा दाखल




शहराचे सौंदर्य बिघडवणाऱ्या आणि ऐतिहासिक वास्तूंचे विद्रुपीकरण करणाऱ्यांवर महानगरपालिकेने आता कडक कारवाईचा बडगा उगारला आहे. सावेडी येथील प्रोफेसर चौकातील छत्रपती संभाजी महाराज स्मारकाच्या कंपाऊंड भिंतीवर १ बीएचके, २ बीएचके भाड्याने मिळेल अशा आशयाचा विनापरवाना जाहिरात फलक लावल्याप्रकरणी एकावर तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी महानगरपालिकेचे प्रभाग अधिकारी बाळासाहेब लक्ष्मण पवार (वय ५६, रा. बालिकाश्रम रस्ता) यांनी फिर्याद दिली आहे. शुक्रवारी पवार आणि त्यांच्या अतिक्रमण विभागाच्या पथकाला ही बाब निदर्शनास आली. पथकाच्या पाहणीत, छत्रपती संभाजी महाराज स्मारकाच्या लोखंडी ग्रीलवर २१ फुटाचा फ्लेक्स बोर्ड आढळला. त्यावर १ बीएचके, २ बीएचके भाड्याने मिळेल असे लिहून मोबाईल क्रमांक देण्यात आला होता. महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता हा फलक लावून शहराचे विद्रुपीकरण केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. पथकाने तात्काळ पंचनामा करून, फोटो काढले आणि सदर विनापरवाना बोर्ड जप्त केला. वरिष्ठांच्या सूचनेवरून बाळासाहेब पवार यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून, सदर मोबाईल क्रमांक धारक अनोळखी व्यक्तीविरोधात महाराष्ट्र मालमत्ता विरूपणास प्रतिबंध अधिनियम १९९५ च्या कलम ३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस अंमलदार खंडागळे करत आहेत.

## देशी-विदेशी दारू बंद असताना विक्री?

### विकणारा सोडला घेणारा पकडला

अंबड । प्रतिनिधी

कार्तिक एकादशी असल्यामुळे शासनाने दारू दुकान बंद आदेश काढला असतानी देशी दारू विक्री होती कशी तिची पण चौकशी पोलिसांनी करणे गरजेचे आहे. देशी दुकान मालकावर गुन्हा दाखल करणे गरजेचे आहे.



अंबड शहरातील मटण मार्केट रोडवरील देशी दारू दुकान व प्रिन्स बार शासनाचा नियम तोडून नियमबाह्य देशी दारू दुकान सकाळी लवकर उघडणे तसेच संध्याकाळी उशिरा बंद करणे असा प्रकार इथे चालत आहे. याप्रकरणी पोलिसांनी कारवाई केली पण बेकायदेशीर देशी विकणारा सोडला व घेणारा पकडला याला म्हणतात चोराच्या उलट्या बोमा देशी दुकानाजवळ गणेश मैंद ह्या व्यक्तीला विनापरवाना देशी-विदेशी दारूची चोरटी विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

त्या माहितीच्या आधारे, पोलिसांनी गणेश मैंद याला ताब्यात घेतले त्याच्याजवळ असलेल्या एका पिशवीत देशी दारूच्या २१ काचेच्या १८० मिलीच्या सीलबंद बाटल्या (प्रत्येकी बॉटलची किंमत १०० रुपये) असा एकूण रु. २,१००/- (दोन हजार एकशे रुपये) किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.य ाप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गणेश मैद च्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिसांनी केली. देशी दुकान नियमाप्रमाणे बंद असताना मग देशी दारू विक्री होती कशी तिची पण चौकशी होणे गरजेचे आहे

## जिल्हाधिकाऱ्यांना फोन जाताच अक्षदा पडण्यापूर्वी १६ वर्षीय मुलीचा विवाह रोखला

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

एका अज्ञात व्यक्तीने १६ वर्षीय मुलीचा २५ वर्षीय मुलासोबत विवाह होणार असल्याची जिल्हाधिकाऱ्यांना लग्नपत्रिका व फोनद्वारे माहिती दिली. त्यांनी जिल्हा महिला बाल विकास समिती अधिकारी आणि दामिनी पथकाला तात्काळ कारवाईचे आदेश दिले. रविवारी पथकाने धाव घेत अक्षदा पडण्यापूर्वीच विवाह रोखला. घरची परिस्थिती बेताची असल्याने आणि वडील दारूच्या आहारी गेल्याने नातेवाईकांनी मुलीचा विवाह लावून देण्याची तयारी केली असल्याचे समोर आले.



पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार, हमालवाडा येथे मोठ्या थाटामाटात लग्नाची तयारी करण्यात आली होती. रस्त्यालगत मंडप, सजावट आणि स्टेज उभारण्यात आले होते. दामिनी पथकाने परिसरात साध्या वेशात गस्त घालून माहिती गोळा केली. स्थानिक नागरिकांनी पोलिसांना कळविले की, लग्न दुपारी १२.३० वाजता होणार आहे. यानंतर पथकाने लग्नमंडपात अचानक धाड टाकली. तेथे नवरीसह उपस्थित मंडळींची चौकशी केली.

महिला बाल विकास अधिकाऱ्यांनी व दामिनी पथकाने दस्तऐवज तपासले असता, मुलीचे वय १६ वर्षे असल्याचे स्पष्ट झाले, तर नवरदेवाचे वय २५ वर्षे होते. नगर येथून व-हाडी मंडळी दाखल झाले होते. जेवणाची तयारी सुरु होती. मंडपात हळद झालेली होती. दोन तासांत अक्षदा पडणारच होत्या. शिकण्याच्या वयात संसाराची दोरी हाती देण्याचा प्रयत्न पोलिसांनी उधळून लावला. नवरी ही शहागडजवळील एका कारखान्याजवळ राहणारी असून, सध्या १२ वी मध्ये शिकते. तिच्या आईचे माहेर हमालवाडा येथे आहे. मुलीचे वडील दारूच्या आहारी गेले असल्याने कुटुंबीयांनी लवकर लग्न लावण्याचा निर्णय घेतला होता. काका, मावशी, मामा यांनी जेवण, भांडी, मंडप असा सर्व खर्च उचलला होता. नवरदेव शिर्डी परिसरातील असून, तो चहा टपरी चालवतो. मुलीची दामिनी पथकाने विचारपूस करताच ती ढसाढसा रडू लागली. मला शिकायचे होते पण घरच्या परिस्थितीमुळे लग्नास तयार झाल्याचे सांगून भावनांना वाट मोकळी करून दिली. नवरीचा मेकअप सुरु असतानाच पथक धडकले. दामिनी पथकातील हेड कॉन्स्टेबल अनिता शिंदे, निर्मला निंभोरे, पुजा जाधव, आनंद वाघ, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी विघ्ने, आम्रपाली बोर्डे, नितेश, सातारा ठाण्याचे एएसआय पांडे, अंमलदार सुनिता हाके, गिता ढाकणे यांनी विवाह रोखला. नातेवाईकांना बालविवाह कायद्याची माहिती देऊन समज दिली. मात्र, नवरदेवाला नातेवाईकांनी तेथून काढून दिले होते.

## जिंतूर बाजार समितीच्या हौदात आढळला मृतदेह

परभणी । प्रतिनिधी

जिंतूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील हौदात एकाचा मृतदेह आढळून आला. या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली आहे. काही नागरिकांना बाजार समितीच्या हौदात एक व्यक्ती पाण्यात बुडाल्याचे दिसून आले. त्यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय जाधव, पोलीस हवालदार दुधाटे व देवकते यांच्यासह पथक घटनास्थळी दाखल झाले.

सामाजिक कार्यकर्ते नागेश आकात आणि स्थानिक नागरिकांच्या मदतीने हौदातील मृतदेह बाहेर काढण्यात आला. प्राथमिक पंचनामा करून मृतदेह ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आला. तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ. शेख अफरोज यांनी तपासणीअंती त्या व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे घोषित केले.सपोनि विजय जाधव यांनी मृत व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी परिसरातील नागरिकांना व सोशल मीडियावर फोटो पाठवून माहिती मागवली. त्यानंतर मिळालेल्या माहितीच्या आधारे मृत व्यक्तीची ओळख राजू किशन धामणे (वय ४५, रा. रमाई नगर, बोरी) अशी पटली. मृतक विवाहित असून पत्नी, दोन मुले आणि एक मुलगी असा परिवार आहे. तो चर्मकार व्यवसायानिमित्त वारंवार बाहेर राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळालेली आहे.

## आ. उढाण यांनी निवडणुकीच्या तोंडावर ५ कोटींचा निधी आणली?

घनसावंगी । प्रतिनिधी

घनसावंगी विधानसभा मतदारसंघासाठी विकासाचा नवा अध्याय सुरू झाला आहे. आमदार हिकमत उढाण यांनी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या तोंडावर घनसावंगी व तीर्थपुरी नगरपंचायत क्षेत्रासाठी एकूण ५ कोटी रुपयांचा निधी शासनाने मंजूर केला आहे असे छाती ठोकपणे सांगत आहे. यासंदर्भातील दिनांक ३० ऑक्टोबर मंत्रालयातील नियोजन विभागाने सदरील आदेश जारी केला आहे. या निधीमधून घनसावंगी व तीर्थपुरी गावातील रस्त्याची सुधारणा होणार आहे. यात घनसावंगी वर अन्याय करून १ कोटी ५० लाख रूपये तर तीर्थपुरीसाठी ३ कोटी ५० लाख ८० हजार रुपये शासनाकडून मंजूर देण्यात आली आहे. अशी एकूण अंदाजित खर्च ५ कोटी रुपये असून, ही सर्व कामे संबंधित नगरपंचायतींच्या माध्यमातून कार्यान्वित करण्यात येणार आहेत.



मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत जालना जिल्ह्यात सर्वाधिक मंजुरी घनसावंगी विधानसभा मतदारसंघाला मिळाली आहे. या योजनेअंतर्गत एकूण १६ उपकेंद्रांना अतिरिक्त क्षमतेचे रोहित्र मंजूर झाले असून यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना अखंडित व कार्यक्षम वीजपुरवठा मिळण्यास मोठी मदत होणार आहे. यात घनसावंगी, भाटेपुरी, शहागड, एकलहेरा, देवडे हादगाव, सिंदखेड, शिवनगाव, जिरडगाव, रामनगर, वडीगोद्री, सुखापुरी, चंदनापुरी, साडेगाव, बानेगाव, पिंपळखेड बु, अंतरवाली टेंभी आदी उपकेंद्राचा समावेश आहे. या मंजुरीबद्दल आ. हिकमत उढाण यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांचे आभार मानले असून, शासनाच्या माध्यमातून प्रत्येक गावात पायाभूत सुविधा पोहोचवण्याचा आमचा संकल्प असल्याचे ते म्हणाले.

## जुन्या वादातून युवकाचा कुऱ्हाडीने खून

धाराशीव । प्रतिनिधी

तुळजापूर तालुक्यातील मौजे केशेगाव येथे आज सकाळी झालेल्या धक्कादायक घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. कुऱ्हाडीने वार करून भरदिवसा तरुणाचा निघृण खून झाला आहे. केशेगाव येथील चावडी चौकात हा प्रकार घडला. जुन्या वादातून हा प्रकार घडला आहे.

या प्रकरणी पोलिसांनी आरोपीस ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सिध्दाराम पंडित दहीटणे (वय ३५) हे सकाळी चावडी चौकातील एका हॉटेलजवळ खुर्चीवर बसून मोबाईल पाहत होते. त्याचवेळी निखिल कांबळे हा मोटार सायकलवर तेथे आला. हातात कुऱ्हाड घेऊन तो दहीटणे यांच्या मागे गेला आणि अचानकपणे त्यांच्या मानेवर आणि शरीरावर सपासप वार केले. सलग सात ते आठ घावांमुळे दहीटणे जागीच कोसळले आणि त्यांचा मृत्यू झाला. खून करून निखिल कांबळे हा घटनास्थळावरून मोटारसायकलवरून पसार झाला. घटनेची माहिती मिळताच नळदुर्ग पोलिस ठाणे आणि इटकळ औट पोस्टचे पोलिस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी तत्परतेने पाठलाग करून आरोपी निखिल कांबळे यास ताब्यात घेतले. या घटनेमुळे केशेगाव व परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्राथमिक माहितीनुसार, पूर्वी झालेल्या वादातून हा प्रकार घडल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, या खुनाचा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, दृश्ये अत्यंत भयानक आणि थरारक स्वरूपाची आहेत. पुढील तपास नळदुर्ग पोलिस करीत आहेत.

**जाहीर प्रगटन**

**गा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक १६४४/२०२५**

CNR No. MHBI020000036042025

**वैशाली बाळू भंडारे व इतर ३ वि. निरंक (मार्फत ॲड एस.कुंभार)**

अर्जदार : १. वैशाली भ्र. बाळु भंडारे, वय ४२ वर्षे, धंदा-घरकाम, रा. धानोरा रोड, नरसोबा नगर बीड ता. जि. बीड, २. शैलेश पि. बाळु भंडारे, वय-२२ वर्ष, धदा-शेती, रा. धानोरा रोड, नरसोबा नगर बीड ता.जि. बीड, ३. योगेश पि. बाळु भडारे, वय-२१ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. धानोरा रोड, नरसोबा नगर बीड ता. जि. बीड, ४. वैष्णवी पि. बाळु भंडारे, वय १६ वर्षे, धंदा-शिक्षण, अ.पा.क. आई अर्जदार क. १ वैशाली बाळु भडारे, रा. धानोरा रोड, नरसोबा नगर बीड ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलग २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत. वरील अर्जदार क. १ ते ४ यांनी या न्यायालयात मयत बाळु उत्तमराव भंडारे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत बाळु उत्तमराव भंडारे यांचा दिनांक १५/०९/२०२५ रोजी मृत्यु झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ ही मयताची मुले आहेत व अर्जदार क्र. ४ ही मयताची मुलगी आहे. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत बाळु उत्तमराव भंडारे यांचे मृत्युननंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**प्रकरणातील पुढील तारीख ११/१२/२०२५ आज दिनांक ०१ माहे नोव्हेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले**

**आदेशावरु**
**स्वाक्षरित**
**अधिक्षक**
**सह दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड**

**स्वाक्षरित**
**क लिपीक**

## व्यापार, उद्योगाच्या सुलभतेसाठी सुधारकार्य योजना क्रांतिकारी उपक्रम-सतीश पंच

जालना । प्रतिनिधी

राज्य सरकारने महाराष्ट्रात व्यवसाय सुलभतेचे वातावरण अधिक बळकट करण्यासाठी 'सुधार कार्य योजना २०२५' राबविण्याचा निर्णय घेतला असून, त्याची औपचारिक अंमलबजावणी सुरू झालेली आहे. ही योजना व्यापार व उद्योग सुलभतेसाठी राज्य सरकारचा क्रांतिकारी उपक्रम असल्याने जिल्हास्तरीय प्रशासनाला अधिक अधिकार मिळणार असून, गुंतवणुकीला मिळणार नवी दिशा मिळेल, असा विश्वास कॅटचे राज्य उपाध्यक्ष आणि जालना व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सतीश पंच यांनी व्यक्त केला.

श्री. पंच म्हणाले की, या योजनेअंतर्गत जिल्हास्तरीय प्रशासनाला वाढीव अधिकार देऊन परवाने, बांधकाम मंजुरी, श्रम कायदे, वीज-पाणी सेवा आणि सार्वजनिक सेवा वितरणाशी संबंधित सर्व प्रक्रिया अधिक सुलभ आणि पारदर्शक करण्यात येणार आहेत. राज्य सरकारची 'सुधार कार्य योजना २०२५' ही व्यापारी व उद्योजकांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरेल. '२.०' या एकात्मिक डिजिटल प्रणालीमुळे सर्व परवानग्या व मंजुरी प्रक्रिया एकाच खिडकीतून सुलभ होतील. या उपक्रमामुळे लघु व मध्यम व्यापार, उद्योग क्षेत्राला थेट लाभ मिळेल आणि



जिल्हास्तरीय प्रशासनात गुंतवणूकदारांबद्दल अधिक संवेदनशीलता येईल.विशेष म्हणजे, जिल्हा प्रशासनाला निर्णयक्षमतेचे स्वातंत्र्य दिल्याने व्यापार, उद्योग विकासाची गती वाढेल, असे ते म्हणाले.

राज्य सरकारने या योजनेची अंमलबजावणी १५ ऑगस्ट २०२६ पर्यंत टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. महाराष्ट्राला क्षेत्रात देशातील सर्वोत्तम राज्य बनविणे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ध्येय आहे. जिल्हास्तरीय सक्षमीकरण हे त्यासाठी निर्णायक ठरेल. राज्य शासनाच्या या उपक्रमाअंतर्गत जिल्हाधिकाऱ्यांना अधिक प्रशासकीय आणि कायदेशीर अधिकार दिले जाणार असून, स्थानिक पातळीवरील परवानग्या आणि व्यापार- उद्योगाशी संबंधित प्रक्रिया अधिक जलदगतीने पूर्ण करता येतील. ही योजना महाराष्ट्रातील व्यापार आणि उद्योग क्षेत्राला नवसंजीवनी देईल. जालना, औरंगाबाद, नांदेडसारख्या औद्योगिक जिल्ह्यांतील व्यापारी आणि उद्योजकांना याचा थेट फायदा होईल. शासनाची ही कार्यपद्धती म्हणजे 'विकेंद्रीकरणातून विकास' या विचाराची ठोस अंमलबजावणी आहे. ही योजना महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगती, रोजगारनिर्मिती आणि गुंतवणुकीच्या संधींच्या विस्तारासाठी एक ऐतिहासिक पाऊल ठरू शकते, असे मत व्यापारी व औद्योगिक वर्तुळात व्यक्त केले जात असल्याचे पंच म्हणाले.

# यश ढाका खून प्रकरणी बीड शहरात जन आक्रोश मोर्चा

## न्याय मिळाला नाही तर आझाद मैदानावर धडकणार -अजिंक्य चांदणे

बीड । प्रतिनिधी

दि.२५ सप्टेंबर रोजी रात्री माने कॉम्प्लेक्स परिसरात यश वाक्यावर चाकूने वार करून निघृण हत्या करण्यात आली. या प्रकरणात न्याय मिळाला नसल्याने ढाका कुटुंच यांच्या वतीने डॉ. बाबासाहेय आंबेडकर पुतळा येथून ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये ढाका कुटूंबीयांसह आ. संदीप क्षीरसागर, माजी आ. सय्यद सलीम, डेमोक्रॉटिक पार्टी ऑफ इंडियाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अजिंक्य चांदणे यांच्यासह अन्य पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी अजिंक्य चांदणे यांनी या प्रकरणात एसआयटी





नेमण्याची मागणी केली न्याय मिळाला नाही तर मुंबईच्या आझाद मैदानावर मोर्चा घेऊन जाण्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

यशला अजून न्याय मिळालाच नाही त्याची आत्मा तरी शांत कधी होणार? ढाका कुटुंबीयांचे स्पष्ट आरोप पोलीस प्रशासनाने यामध्ये योग्य व सखोल तपास केलेला नाही. मुख्य आरोपींवरील कारवाई विलंबातच आहे. म्हणूनच आज हा मोर्चो काढावा लागला, आक्रोश, अश्रू, राग आणि न्यायाची चिरफाड करणारं वातावरण असा भावना आज बीड शहरात उसळल्या होत्या, बीड शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरात २५ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी आठ ते साडेआठ दरम्यान यश देवेंद्र ढाका याची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या गुन्ह्यातील चार आरोपींना अटक झाली असली, तरी या प्रकरणातील प्रमुख सूत्रधार गणेश गोरख शिराळे अद्यापही फरार आहे. फरार आरोपीकडे तपास यंत्रणेचे दुर्लक्ष होत असल्याचा ढाका परिवाराचा आरोप आहे. अनेक वेळा पाठपुरावा करूनही गणेश शिराळेवर गुन्हा नोंद न झाल्याने या गंभीर हत्याकांड प्रकरणाला पोलीस विभाग कमी लेखत असल्याची भावना समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला असून सामान्य नागरिकही न्यायाच्या मागणीसाठी रस्त्यावर उतरले. विधि प्रक्रिया व संविधानिक चौकटीत राहून न्याय मिळेपर्यंत आवाज बुलंद ठेवण्यात येईल. प्रशासनाकडून विशेष गांभीर्याने या मागण्यांचा त्वरित विचार न झाल्यास, पुढील स्तरावर विभागीय कार्यालयांवर तसेच नंतर मंत्रालयावर मोठ्या स्वरूपात आंदोलन उभारण्याचा इशारा देण्यात आला आहे. संपूर्ण बीड जिल्हा या हत्याकांडाकडे लक्ष ठेवून आहे, न्याय न मिळेपर्यंत लढा सुरू राहील अशी कुटुंबीयांची भूमिका आहे.

### तर आझाद मैदानावर मोर्चा काढू-चांदणे

यश ढाका प्रकरणांमध्ये पोलीस वेळ काढू भुमिका घेत आहे. या प्रकरणाचा तपास पोलिसांकडून काढून एस. आय. टी. कडे द्यावा, यश ढाका प्रकरणात न्याय मिळाला नाही तर विभागीय स्तरावर आणि त्यानंतर मंत्रालय स्तरावर मोर्चा काढून न्याय मिळेपर्यंत आंदोलन चालूच राहील असा इशारा यावेळी डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे राज्य अध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी दिला.

## आ.धस यांच्या प्रयत्नातून कासारी-मुर्शदपुर-शिदेवाडीच्या विकासाचा मोठा बॅक लॉक भरून निघाला -सरपंच मुळे

आष्टी । प्रतिनिधी

लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांच्या ताब्यात कासारी मुर्शिदपुर ग्रामपंचायत आल्यापासून या भागात मोठ्या प्रमाणावर विकास कामे झाले आहेत. यामध्ये प्रत्येक वार्डामध्ये सिमेंट ब्लॉक रस्ते डांबरीकरण रस्ते, त्याचबरोबर मुलांच्या शाळेला तसेच या भागातील प्रसिद्ध असणाऱ्या माऊली मंदिराला वॉल कंपाऊंड घनकचरा व्यवस्थापन तर आत्ताच माऊली सुशोभीकरणाकरिता तब्बल पन्नास लक्ष रुपये व मुर्शिदपूर उप आरोग्य केंद्राकरिता ४२ लाख रुपये आमदार सुरेश आण्णा धस यांनी मंजूर करून आणले आहे आमदार सुरेश धस हे नेहमीच विकासात्मक कामाकडे त्यांची दूरदृष्टी असते यातूनच कासारी मुर्शिदपूर ग्रामपंचायत चा विकास होताना दिसत आहे





कासारी मुर्शिदपूर ग्रामपंचायतला पाणीपुरवठ्याचे पेज योजनेअंतर्गत जवळपास पाच कोटी रुपयांचे काम प्रगतीपथावर आहे अशाप्रकारे कासारीमुर्शदपुर शिदेवाडी ग्रामपंचायत अंतर्गत वाड्या वस्त्यांवर शेतामध्ये पांदण रस्ते असतील सिंचन विहिरी असतील तसेच रोजगार हमी योजनेअंतर्गत देखील मोठ्या प्रमाणावर रस्ते कामे झाली आहेत याबद्दल सरपंच शालिनी अशोक मुळे उपसरपंच जालिंदर वांढरे सर्व सदस्य यांनी आमदार सुरेश आण्णा धस तसेच राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस साहेबांचे आभार मानले आहे.

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे बुधवारी दयानंद म. कोरेगावकर यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील तिसऱ्या पुण्यतिथी कार्तिक शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प.दयानंद महाराज कारेगांवकर यांचे बुधवार दिनांक ५ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी मौज यांच्याकडून



महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

## साईनाथ बोडखे यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार जाहीर

आष्टी । प्रतिनिधी

लोकशक्ती न्यूज नेटवर्क महाराष्ट्राचा लोकशक्ती आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील सुदर्शन विद्यालयाचे मुख्याध्यापक साईनाथ कारभारी बोडखे यांना जाहीर झाला आहे. लवकरच अहिल्यानगर येथे मान्यवरांच्या शुभ हस्ते सन्मान प्रदान करण्यात येईल अशी माहिती मुख्य संपादक विजय लेंडाळ यांनी दिली आहे.

लोकशक्ती महाराष्ट्र गौरव पुरस्कार सोहळा २०२५ साजरा होत आहे या समारंभमध्ये लोकशक्ती



आदर्श मुख्याध्यापक म्हणून साईनाथ बोडखे यांचा गौरव होणार आहे.या निवड पत्रात म्हटले आहे की,मुख्याध्यापक बोडखे यांनी मुख्याध्यापक म्हणून शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे लोकशाही महाराष्ट्र गौरव पुरस्कार सोहळा २०२५ साजरा होत आहे.या सोहळ्यासाठी आपली निवड करण्यात आली असून हा सोहळा अहिल्यानगर येथे मान्यवर लोकप्रतिनिधी कलावंत अधिकारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न होणार आहे.मुख्याध्यापक बोडखे यांनी शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण केले आहे बोडखे यांच्या कार्य कर्तृत्वातून ◀◀ पान ३ वर

## शेवगाव येथील वकिलांवरील हल्ल्याचा पाटोदा वकील संघाकडून तीव्र निषेध

पाटोदा । प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव न्यायालयात एका सुनावणीदरम्यान उलट तपास सुरू असताना तेथील एका वकिलावर झालेल्या हल्ल्याच्या घटनेमुळे संपूर्ण विधीजगतात संतापाची लाट उसळली आहे. या घटनेचा निषेध महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलकडून करण्यात आला असून, पाटोदा वकील संघानेही सोमवारी या घटनेचा तीव्र निषेध नोंदवला.

या वेळी पाटोदा वकील



संघाकडून वकिलांच्या सुरक्षेसाठी एडव्होकेट्स प्रोटेक्शन बिल तातडीने लागू करण्याची मागणी करण्यात आली. निषेध सभेत सर्व वकिलांनी लाल फीत बांधून शासनाचे लक्ष वेधले तसेच यावेळी दोषी आरोपींवर तातडीने गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी देखील पाटोदा वकील संघाकडून करण्यात आली.कार्यक्रमास पाटोदा वकील संघाचे अध्यक्ष अॅड. बी. आर. लवुळ, उपाध्यक्ष अॅड. जब्बार पठाण, सचिव अॅड. विलास पवार, कोषाध्यक्ष अॅड. विशाल मस्के, ज्येष्ठ विधीज्ञ अॅड. रवींद्र औटे, अॅड. सचिन जावळे, अॅड. डी. एन. पारगावकर, अॅड. एस. बी. थोरवे, अॅड. एम. एस. पांडव, एडवोकेट उत्तमराव ◀◀ पान ३ वर

## राष्ट्रीय महामार्ग शंभरचिरा ते अहिल्यानगर -बीड महामार्गाच्या ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था बिकट

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील सौताडा, येवलवाडी, शंभरचिरा परिसरात अहिल्यानगर-बीड राष्ट्रीय महामार्गाचे काम सध्या सुरू आहे. परंतु, या मार्गावर सौताडा, येवलवाडी, वानेवाडी, शंभरचिरा दरम्यान काळ्या मातीचा वापर करण्यात आल्याने पाऊस आल्यानंतर रस्त्यावर चिखल होऊन वाहने घसरू लागली आहेत. दररोज लहान-मोठे अपघात वाढले आहेत. अहिल्यानगर आणि बीड या दोन्ही जिल्ह्यांना जोडणाऱ्या रस्त्याची अवस्था सध्या बिकट झाली आहे.

राष्ट्रीय महामार्ग शंभरचिरा ते अहिल्यानगर बीड महामार्गाच्या ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था बिकट



पाटोदा तालुक्यातील येवलवाडी, पारनेर, अनपटवाडी, नफरवाडी, बेलेवाडी, बांगरवाडी या ठिकाणच्या रस्त्यांची दुर्दशा झाली असून, अंतर्गत रस्ते पावसामुळे खराब झाल्याने दळणवळणावर परिणाम झाला आहे. पाटोदा शहराला जोडणारे हे रस्ते उखडले असून, अपघातांचे प्रमाण वाढले आहे.

कामाच्या ठिकाणी मुरूम टाकण्याऐवजी काळी माती टाकण्यात आली आहे. थोडा जरी पाऊस आला तरी ◀◀ पान ३ वर



**बीड : शहरातील सुभाष रोडवर भाजी मंडई कडे जाणाऱ्या चौकामध्ये सोमवारी दुपारी वाहतुकीची कोंडी झाली यावेळी नागरिकांनी वाहतुकीची कोंडी सोडवण्यासाठी प्रयत्न केले. मात्र वाहतूक पोलिसांचा या ठिकाणी पत्ताच नव्हता. सणासुदीच्या काळामध्ये सुभाष रोडवर कायम गर्दी असते.याठिकाणी मोठमोठी दुकाने असल्याने आणि भाजीमंडईही लागून असल्याने याठिकाणी असलेल्या चौकात कायम गर्दी असते. याठिकाणी शहर वाहातुक शाखेच्या वतीने कायम दोन वाहातूक पोलीसांची नियुक्ती करणे गरजेचे असतानाही याठिकाणी एकही कर्मचारी उपस्थित नसतो. वाहातूक शाखेच्या वतीने या चौकात दोन कर्मचाऱ्यांची कायमस्वरूपी नियुक्ती करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे. याशिवाय ज्याठिकाणी कायम वाहातूकीची कोंडी होते अशा सर्वच ठिकाणी प्रत्येकी एक कर्मचारी नियुक्त करावा अशीही मागणी नागरिक करत आहेत.**

## तेलगाव-माजलगाव रस्त्यावरच्या काटेरी झुडपांचा प्रश्न कधी मिटणार?

### प्रवाशांचा त्रास वाढला, प्रशासनाचे कायम दुर्लक्ष

पात्रुड । प्रतिनिधी

तेलगाव-माजलगाव दरम्यानचा रस्ता वर्षभर वाहतुकीने गजबजलेला असला, तरी या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी उगवलेल्या काटेरी झुडपांमुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. मोटारसायकलस्वार, सायकलस्वार आणि पादचारी यांना या झुडपांमुळे वारंवार अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. काही ठिकाणी काटेरी फांद्या रस्त्यावर झुकल्याने वाहनचालकांना अडचणी येतात, तर रात्रीच्या वेळी या झुडपांमुळे दृश्यमानता कमी होऊन गंभीर अपघातांची शक्यता वाढते.

या रस्त्याची दुरवस्था आणि झुडपांच्या अतिक्रमणाबाबत नागरिकांनी वारंवार ग्रामपंचायत व सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रारी केल्या आहेत. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. स्थानिक शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, ''रस्त्याच्या कडेला वेळोवेळी सफाई केली असती, तर ही परिस्थिती उद्भवली नसती. सध्या रस्त्याचा उपयोग करण्यासही भीती वाटते.''

दरम्यान, काही दिवसापूर्वी लोकाशाने हाच मुद्दा उचलून धरला होता, त्यानंतर सुद्धा सफाई झाली नाही. मात्र काही दिवसांत पुन्हा जास्त झुडपे वाढली. आता प्रवासी आणि ग्रामस्थांनी एकमुखाने मागणी केली आहे की, रस्त्याच्या दोन्ही बाजूंची काटेरी झुडपे कायमस्वरूपी काढून स्वच्छता मोहिम राबवावी.

प्रवाशांचा त्रास दिवसेंदिवस वाढत असताना, स्थानिक नागरिकांमध्ये आता रोष निर्माण झाला आहे. तेलगाव-माजलगाव रस्त्याची दुरवस्था आणि काटेरी झुडपांचा प्रश्न वर्षभर अधोरेखित





होत असला तरी, संबंधित गुत्तेदाराने आपल्या जबाबदारीकडे पूर्णतः दुर्लक्ष केले आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वाढलेली झुडपे, खड्डे आणि दुर्लक्षित साफसफाईमुळे या मार्गावरून प्रवास करणे धोक्याचे बनले आहे. प्रवासी तसेच ग्रामस्थांचा प्रश्न आहे की, काम पूर्ण झाल्यानंतर देखरेख न करणाऱ्या गुत्तेदारावर ◀◀ पान ३ वर

## भगवान गडावरील ज्ञानेश्वर माऊली मंदिराचे काम प्रगतीपथावर

### सात कोटी रुपये खर्च करून होणार जगातील सर्वात भव्य दिव्य मंदिर

**बीड । विशाल साळुंके**

बीड जिल्हा आणि अहिल्यानगर जिल्ह्याच्या सरहद्दिवर असलेल्या संत श्रेष्ठ श्री भगवान बाबा यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भगवानगडावर महंत नामदेव शास्त्री महाराजांच्या अथक प्रयत्नातून सर्व जगाची माऊली ज्ञानेश्वर महाराजांचे भव्य दिव्य मंदिर उभारले जात असून यासाठी जवळपास सात कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. हे जगातले सर्वात सुंदर मंदिर असणार आहे. यासाठी कर्नाटक राज्यातून विशिष्ट दगड आणून त्याच्यावर नक्षीकाम करण्याचे काम सध्या जोरात सुरू आहे. काही प्रमाणात या मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले आहे.





भगवानगड पूर्वी धौम्य ऋषीच्या पावन पदस्पर्शाने पुणीत झाल्याने या गडाला धौम्य गड असे नाव होते. त्यानंतर संत श्रेष्ठ श्री भगवान बाबा नारायण गडावरून धौम्य गडावर आले .त्यानंतर संपूर्ण जीवन भगवान बाबांनी याच ठिकाणी व्यतीत केले. त्यामुळे या गडाला भगवानगड असे नाव देण्यात आले. भगवान बाबांच्या नंतर त्यांचे शिष्य भीमसिंह महाराज यांनी या गडाला नावारूपाला आणले. भीमसिंह महाराजांचे शिष्य महंत नामदेव शास्त्री महाराज यांनी या गडाच्या बांधकामावर जणू कळसच चढवला. आज या ठिकाणी कोट्यावधी रुपये खर्चाचे सुंदर मंदिर उभे राहिले आहे. नामदेव शास्त्री महाराज यांच्या संकल्पनेतून या ठिकाणी जगाची माऊली असलेल्या ज्ञानेश्वर महाराजांचे जगातील सर्वात सुंदर आणि भव्यदिव्य मंदिर बांधण्याचा विचार आला. त्यांनी हे मंदिर बांधण्याचा संकल्प केल्यानंतर भगवान गडाच्या भक्तांकडून यासाठी देणगी मागितली. भगवान गडाच्या भक्तांनी या मंदिराला भरभरून देणगी दिली. प्रत्येक गावातून किमान ५० लाख रुपये या मंदिरासाठी भाविकांनी दिले. पन्नास लाखापासून दीड कोटी पर्यंत देणगी या मंदिरासाठी जमा झाली. या देणगीतून जवळपास सात कोटी रुपये खर्च करून बांधण्यात येणारे हे मंदिर बांधकामाचा शुभारंभ करण्यात आला. आज या मंदिराचे काम प्रगतीपथावर आहे. या मंदिराच्या बांधकामासाठी खास कर्नाटक मधून विशिष्ट दगड आणण्यात आला आहे. तसेही भगवानगडावरचे बहुतांश काम हे दगडी बांधकाम आहे. तसेच हे मंदिरही दगडाने मात्र नक्षीकाम करून पुरातन मंदिराची साक्ष देणारे ठरणार आहे. या मंदिराचे काम बऱ्यापैकी पूर्ण झाले आहे. आजही शेकडो हात या मंदिराच्या बांधकामासाठी दगड कोरून त्यावर नक्षीकाम करण्यात गुंतलेले आहेत. भगवानगडावर एकादशी, दसरा आणि महत्त्वाच्या सणाला जाणारे भाविक आवर्जून या मंदिराकडे जाऊन कामाची पाहणी करून कौतुक करतात. या मंदिरासाठी भाविकांचा हातभार लागलेला आहे. त्यामुळे हे मंदिर सर्व भाविकांचे मंदिर असणार आहे. या ठिकाणी कीर्तनासाठी विद्यार्थ्यांना तयार केले जाते. त्यासाठी निवासी शाळा ही आहे. भगवानगडाचे महंत नामदेव शास्त्री महाराज यांनी आता या गडासाठी कृष्णा महाराज यांना उत्तराधिकारी नेमले आहे. तेही या कामासाठी संपूर्णपणे झोकून देऊन मदत करत आहेत. गडावर जाणारा प्रत्येक जण या मंदिराचे काम पाहून सुखावत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# ३६ वी किशोर-किशोरी गट राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा बुधवारपासून बोपखेलमध्ये- अण्णा बनसोडे

**पिंपरी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने आणि पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या सहकार्याने होणारी ३६वी किशोर आणि किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा ५ नोव्हेंबरपासून श्रीरंग भाऊ धोदाडे क्रीडानगरी, बोपखेल गावठाण येथे सुरू होत आहे. पाच दिवस चालणाऱ्या या स्पर्धेची गटवारी विधानसभेचे उपाध्यक्ष आमदार अण्णा बनसोडे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत जाहीर केली.

दरम्यान स्पर्धेचा समारोप २९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता होणार असून, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत होणार आहे. तसेच या कार्यक्रमासाठी क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ माजी विधानसभा अध्यक्ष दिलीप वळसे पाटील, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषीमंत्री दत्ता भरणे राज्यमंत्री माधुरी मिसाळ उपस्थित राहणार असल्याचेही अण्णा बनसोडे यांनी सांगितले.

सोमवारी पिंपरी येथे झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये राज्य कबड्डी असोसिएशनचे कार्याध्यक्ष बाबुराव चांदेरे, पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष अतुल बेनके, कार्याध्यक्ष दत्तात्रेय कळमकर, सहकार्यवाह दत्तात्रय झिंजुर्डे, राजेंद्र ढमढेरे, खजिनदार प्रकाश पवार, राष्ट्रीय पंचप्रमुख गजानन मोकल, माजी नगरसेवक अविनाश काटे, राष्ट्रवादी काँग्रेस शहर उपाध्यक्ष शशिकांत घुले तसेच सतीश लांडगे, संजय अवसरमल आदी उपस्थित होते. दरम्यान स्पर्धेचे परीक्षण विविध जिल्ह्यातून येणारे ४० हून अधिक राष्ट्रीय पंच करणार आहेत.

स्पर्धेची माहिती देताना बाबुराव चांदेरे म्हणाले, यांना निवड चाचणी स्पर्धा बोपखेल येथील श्रीरंग भाऊ धोदाडे क्रीडा नगरी येथे पार पडणार

## पिंपरी चिंचवडला निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे यजमानपद!



आहे. यजमानपद पिंपरी चिंचवड शहराला प्राप्त झाले आहे. स्पर्धेचा शुभारंभ किशोर गटातील परभणी विरुद्ध बीड, पिंपरी चिंचवड विरुद्ध रायगड आणि रत्नागिरी विरुद्ध मुंबई उपनगर पूर्व या सामन्यांनी होणार आहे. किशोरी गटात नाशिक शहर विरुद्ध ठाणे ग्रामीण, पिंपरी-चिंचवड विरुद्ध नांदेड आणि परभणी विरुद्ध जळगाव हे सामने पहिल्या दिवशी रंगतील.

विशेष म्हणजे गतवर्षी मनमाड येथे झालेल्या या स्पर्धेत किशोर गटात परभणीने आणि किशोरी गटात नाशिक शहरने विजेतेपद पटकावले होते. पिंपरी चिंचवड संघाला दोन्ही गटात उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. यंदा स्पर्धा शहरातच होत असल्याने पिंपरी चिंचवड संघाला घरच्या मैदानाचा लाभ घेता येतो का याकडे कबड्डीप्रेमींचे लक्ष लागले आहे.

अशी असेल स्पर्धेची गटवारी : किशोर गटात एकूण आठ गटांची विभागणी करण्यात आली आहे. 'अ' गटात परभणी, जळगाव आणि बीड, ब गटात पिंपरी चिंचवड, पुणे शहर, रायगड आणि सोलापूर, क गटात रत्नागिरी, नांदेड, मुंबई उपनगर पूर्व आणि सिंधुदुर्ग, ड गटात जालना, पालघर, नाशिक शहर आणि हिंगोली या संघांचा समावेश आहे. इ गटात ठाणे ग्रामीण, उस्मानाबाद, नाशिक ग्रामीण आणि सातारा, फ गटात कोल्हापूर, औरंगाबाद, धुळे आणि मुंबई शहर पूर्व, ग गटात मुंबई उपनगर पश्चिम, अहमदनगर, लातूर आणि ठाणे शहर तर ह गटात नंदुरबार, सांगली, मुंबई शहर पश्चिम आणि पुणे ग्रामीण संघ स्पर्धेत उतरतील.

किशोरी गटात अ गटात नाशिक शहर, मुंबई उपनगर पश्चिम आणि ठाणे ग्रामीण, ब गटात पिंपरी-चिंचवड, नंदुरबार, नांदेड आणि बीड, क गटात परभणी, रत्नागिरी, जळगाव आणि सोलापूर, ड गटात सांगली, ठाणे शहर, सातारा आणि औरंगाबाद, इ गटात पुणे ग्रामीण, अहमदनगर, पालघर आणि धुळे, फ गटात नाशिक ग्रामीण, कोल्हापूर, लातूर आणि हिंगोली, ग गटात जालना, पुणे शहर, उस्मानाबाद आणि सिंधुदुर्ग तर ह गटात मुंबई उपनगर पूर्व, रायगड, मुंबई शहर पश्चिम आणि मुंबई शहर पूर्व संघ सहभागी झाले आहेत. प्रतिक्रिया

कबड्डीचा धुरळा उडवण्यासाठी खेळाडू सज्ज आहेत. स्पर्धा सुरळीत पार पाडण्यासाठी पूर्ण तयारी केली आहे,

राज्यभरातून प्रतिभावान खेळाडूंना संधी मिळवून देणारी ही किशोर किशोरी गट राज्य अजिंक्यपद राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा रंगतदार होणार असून कबड्डी प्रेमींसाठी रोमांचक लढतींचा आनंद घेण्याची पर्वणी ठरणार आहे.

बाबुराव चांदेरे

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन

कबड्डी हा आपल्या परंपरेचा खेळ आहे. आजच्या डिजिटल युगात अशा स्पर्धांमुळे तरुण वर्ग पुन्हा मैदानावर येतो, हे आनंददायी आहे,पिंपरी चिंचवडला निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे यजमानपद मिळाले असून, स्थानिक खेळाडूंना यातून प्रोत्साहन मिळते.


अण्णा बनसोडे उपाध्यक्ष, विधानसभा महाराष्ट्र राज्य.

# शिरूर-जुन्नर परिसरात बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांवर नियंत्रणासाठी राज्यस्तरीय बैठक

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यात काल पुन्हा एकदा बिबट्याच्या हल्ल्यात दुर्दैवाने एका नागरिकाचा मृत्यू झाला असून, या भागात मानव-बिबट संघर्ष अधिकच तीव्र झाला आहे. गेल्या काही महिन्यांपासून जुन्नर, शिरूर व परिसरात बिबट्यांच्या हल्ल्यांचे प्रमाण वाढले असून, आतापर्यंत अनेक निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे वनमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उद्या, ४ नोव्हेंबर २०२५ रोजी मुंबई येथील मंत्रालयात उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी, संबंधित जनप्रतिनिधी तसेच स्थानिक पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

बैठकीचे उद्दिष्ट पुणे जिल्ह्यातील



जुन्नर व शिरूर परिसरात बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे होणाऱ्या मानवी जीवितहानीवर नियंत्रण आणण्यासाठी आणि ठोस उपाययोजना आखण्यासाठी आहे. या बैठकीत तातडीच्या प्रतिबंधक उपाययोजना, प्रभावित भागात जनजागृती मोहीम, तसेच वन्यप्राणी नियंत्रण यंत्रणा अधिक प्रभावी करण्याबाबत चर्चा होणार आहे. या बैठकीस माजी मंत्री व आमदार दिलीप वळसे -पाटील, खासदार अमोल कोल्हे, विधानपरिषद सदस्य दादाराव केंचे, आमदार शरद सोनवणे, आमदार हेमंत ओगले, माजी आमदार अतुल बेनके, भाजपा प्रवक्ता वसंतराव जाधव, जनता दल (सेक्युलर) प्रदेशाध्यक्ष नाथाभाऊ शेवाळे, राष्ट्रवादी काँग्रेस कार्याध्यक्ष देवदत्त निकम, जुन्नर तालुका काँग्रेस अध्यक्ष सत्यजित शेरकर, आशाताई बुचके तसेच वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या संदर्भात जनता दल (सेक्युलर) महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा. नाथाभाऊ शेवाळे यांनी सांगितले की, राज्य सरकारच्या निर्देशानुसार आयोजित या बैठकीस मी उद्या उपस्थित राहणार आहे. या गंभीर प्रश्नावर कायमस्वरूपी ठोस उपाययोजना करण्याला माझे प्राधान्य असेल. स्थानिक नागरिकांमध्ये वाढत्या बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे भीतीचे वातावरण असून, या बैठकीकडून मानव-बिबट संघर्षावर नियंत्रण आणण्यासाठी ठोस व कायमस्वरूपी निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# दोन कोटींची लाच मागितली, तक्रारदाराने ४५ लाखांच्या खेळण्यातल्या खोट्या नोटा दिल्या

**पुणे । प्रतिनिधी**

तब्बल दोन कोटी रुपयांची लाच मागितल्या प्रकरणी रंगेहात सापडलेल्या पोलीस उपनिरीक्षक प्रमोद चिंतामणी याला ६ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील आर्थिक गुन्हे शाखेत कार्यरत असलेल्या या पीएसआयला लाचेच्या दोन कोटीपैकी ४६ लाख ५० हजार रुपये स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले होते.

तक्रारदार हे व्यवसायाने वकील असून त्यांच्या आशिलाविरुद्ध बावधन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. त्या गुन्ह्यात आशिलाच्या वडिलांनाही अटक झाली असून ते न्यायालयीन कोठडीत आहेत. संबंधित गुन्ह्याचा तपास पिंपरी चिंचवड आयुक्तालयातील आर्थिक गुन्हे शाखेचा पोलीस उपनिरीक्षकाकडे होता.

तक्रारदाराच्या आशिलाला मदत करण्यासाठी तसेच अटकेत असलेल्या वडिलांच्या जामीन प्रक्रियेत सहकार्य करण्याच्या मोबदल्यात त्या उपनिरीक्षकाने दोन कोटी रुपयांच्या लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे केली होती. एसीबीने याची पडताळणी केली असता आरोपी उपनिरीक्षकाने दोन कोटींपैकी एक कोटी रुपये स्वतःसाठी आणि उर्वरित एक कोटी वरिष्ठांसाठी मागितल्याचे निष्पन्न झाले .त्यानंतर तक्रारदाराने ५० लाख रुपयांचा पहिला हप्ता देण्याचे ठरवले होते. यानंतर लाचलुचपत विभागाने सापळा रचून आरोपी उपनिरीक्षक प्रमोद चिंतामणी याला तक्रारदाराकडून ४६ लाख ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताच रंगेहात पकडले. त्याच्याजवळून लाच रक्कम (त्यापैकी १.५ लाख रुपयाच्या खऱ्या आणि उर्वरित ४५ लाख रुपयांच्या खेळण्यांच्या नोटा), २ मोबाइल फोन आणि रोख रक्कम मिळून एकूण ४६.५३ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

आरोपीने केलेल्या दाव्यानुसार, दोन कोटींची रक्कम एकट्यासाठी मागितली की वरिष्ठ अधिकाऱ्यांचाही यात सहभाग आहे, हे तपासात निष्पन्न होणार आहे. या तपासासाठी आरोपीला ६ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडीचे आदेश दिले आहेत.

# जिल्हा बँकेत स्थानिक तरुणांना प्राधान्य, आता ७० टक्के जागा राखीव

**पुणे । प्रतिनिधी**

बँकिंग क्षेत्रातील नोकरीचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणांसाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि स्थानिकांना प्राधान्य देण्यासाठी आता ७० टक्के जागा जिल्ह्यातील उमेदवारांसाठी राखीव ठेवल्या जाणार आहेत. यामुळे जिल्ह्यातील युवकांना रोजगाराच्या नव्या संधी मिळणार असून, बेरोजगारी कमी करण्यात मदत होईल.

यापूर्वी राज्यातील कोणत्याही जिल्ह्यातील उमेदवार जिल्हा बँकांच्या भरतीसाठी अर्ज करू शकत होते. मात्र, आता नव्या नियमांनुसार ७० टक्के जागा फक्त त्या जिल्ह्यातील रहिवाशांसाठी आरक्षित राहतील. जिल्हा बँकांचे सभासद हे मुख्यत्वे स्थानिक नागरिक असल्याने, नोकरभरतीत त्यांना प्राधान्य द्यावे अशी मागणी सातत्याने होत होती. नुकत्याच झालेल्या पुणे जिल्हा मध्यवर्ती




सहकारी बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांनी ही मागणी जोरदारपणे मांडली होती. या निर्णयाची अंमलबजावणी लवकरच दिसून येणार आहे. पुणे जिल्हा बँकेत येत्या काही दिवसांत लेखनिक, शिपाई आणि वाहनचालक अशा १ हजार ८० पदांसाठी मेगा भरती होणार आहे. या भरतीत पुणे जिल्ह्यातील तरुणांना प्राधान्य दिले जाईल. विशेष म्हणजे, शेतकऱ्यांच्या मुलांना आणखी जास्त संधी मिळाव्यात यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांच्या मुलांना शक्य तितकी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. हा निर्णय राज्यातील इतर जिल्हा बँकांनाही लागू होईल, ज्यामुळे लाखो स्थानिक तरुणांना बँकिंग क्षेत्रात करिअरची नवद्वार उघडणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी लवकरच बँकांच्या अधिकृत वेबसाइटवर भरती अधिसूचना तपासावी आणि अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी.

# पुण्यात खासदार क्रीडा महोत्सवाचे आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात अनेक गुणवान खेळाडू असून, खासदार क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून सर्व खेळाडूंना आपले कौशल्य दाखवण्यासाठी व्यासपीठ मिळणार आहे. त्यातून पुण्यातील क्रीडा संस्कृतीला बळकटी मिळणार असून, या स्पर्धेतून काही खेळाडू देशाचे नेतृत्व करू शकतात, असे मत खेलरत्न पुरस्कारप्राप्त ऑलिंपियन नेमबाज अंजली भागवत यांनी व्यक्त केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या फिट युवा फॉर विकसित भारत, या आवाहनाला प्रतिसाद देत केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकारातून पहिल्या खासदार क्रीडा महोत्सवाची सुरुवात मॅरेथॉनने झाली. स. प. महाविद्यालयाच्या मैदानात रविवारी (दि. २) खासदार क्रीडा



महोत्सवासाठीची ज्योत प्रज्वलित करण्यात आली. या वेळी ऑलिंपियन, आशियाई पदक विजेते आणि सर्वच खेळांतील माजी खेळाडू, प्रशिक्षकांना आमंत्रित केले होते.

व्यासपीठावर श्रीरंग इनामदार, रमेश विपट, सुरेखा द्रविड, गौरव नाटेकर, संदीप कीर्तने, केदार जाधव, रेखा भिडे, मनोज पिंगळे, शांताराम जाधव, मनोर एरंडे, शकुंतला खटावकर, आकांक्षा हगवणे, कौस्तुभ राडकर यांसह आजी- माजी खेळाडू उपस्थित होते. खासदार मोहोळ यांनी आकाशात फुगे सोडून स्पर्धेची सुरुवात केली.मोहोळ म्हणाले, तरुण तंदुरुस्त राहिला, तर देश तंदुरुस्त राहील. त्यासाठीच या स्पर्धेचे आयोजन केले आहे. माझ्या पुण्याने देशाला अनेक खेळाडू दिले आहेत. यानिमित्ताने पुण्यातील क्रीडा संस्कृतीचा प्रचार-प्रसार करायचा आहे. दरम्यान, खासदार क्रीडा महोत्सव १६ नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे. शहरातील विविध मैदानांवर एकूण ३५ प्रकारांच्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले आहे. या महोत्सवात खेळाडूंसोबतच ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि सर्वसामान्य नागरिकांनाही कौशल्य सादर करण्याची संधी मिळणार आहे.

देशात आरोग्य क्रांती - मोहोळ..

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली २०४७ मध्ये विकसित भारतची वाटचाल करीत आहे. त्यासाठीच मोदीजींनी फिट इंडिया, स्लिम इंडिया अशा मोहिमा यशस्वीपणे राबवल्या. त्याला पुणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो. आंतरराष्ट्रीय योग दिन, खेलो इंडिया यांसह अद्ययावत वैद्यकीय सुविधा तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवल्यामुळे भारतात आरोग्य क्रांती झाली आहे, असे मत मोहोळ यांनी व्यक्त केले.

# कोंढव्यातील खून टोळीयुद्धातून! बंडू आंदेकर सूत्रधार ; दोघांना अटक, दोन अल्पवयीन ताब्यात

**पुणे । प्रतिनिधी**

कोंढव्यातील खडी मशिन चौकात भरदिवसा झालेल्या गोळीबारात रिक्षाचालक गणेश काळे याचा खून करण्यात आला. हा खून वनराज आंदेकरच्या खून प्रकरणाचा सूड म्हणून केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. आंदेकर टोळीचा म्होरक्या बंडू आंदेकर आणि त्याचा मुलगा कृष्णा आंदेकर यांनी यासाठी सूचनाही दिल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी दोन अल्पवयीनांसह नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी कृष्णा आंदेकर (२८), बंडू आंदेकर (६९), स्वराज वाडेकर (२५, तिघे रा. डोके तालीम चौक, नाना पेठ), अमीर खान (२५), मयूर वाघमारे (२३), अमन मेहबूब शेख (२३, रा. काकडे वस्ती, कोंढवा), अरबाज अहमद पटेल (२४, रा. काकडे वस्ती, कोंढवा) यांच्यासह दोन अल्पवयीनांवर गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी अमन शेख आणि अरबाज पटेल यांना अटक केली असून, दोघा अल्पवयीनांना ताब्यात घेण्यात आले आहे. गणेश काळेचे वडील किसन धोंडिबा काळे (५१, रा. शिवकृपा बिल्डिंग, येवलेवाडी, कोंढवा) यांनी



यासंदर्भात फिर्याद दिली आहे. अमन शेख आणि अरबाज पटेल हे सराईत गुन्हेगार असून, त्यांच्याविरुद्ध अनेक गंभीर गुन्हे नोंद आहेत. अरबाजला काही वर्षांपूर्वी तडीपार करण्यात आले होते. २०२४ मध्ये त्याच्यावर झोपडपट्टी दादा प्रतिबंधक कायदा (एमपीडीए) अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर तो अकोला कारागृहातून बाहेर पडला. दरम्यान, मार्च २०२४ मध्ये तळेगाव दाभाडे येथे झालेल्या गोळीबारप्रकरणी अमन शेख आणि समर्थ तोरणे यांच्या ताब्यातून तीन पिस्तुले आणि चार काडतुसे जप्त करण्यात आली होती. गणेश काळे खून प्रकरणातील दोघा अल्पवयीनांवरही यापूर्वी गुन्हे नोंद आहेत. माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्या खून प्रकरणात गणेश काळेचा भाऊ समीर काळे याला अटक करण्यात आली होती आणि तो सध्या येरवडा कारागृहात आहे. त्या खटल्याचा सूड उगवण्यासाठीच हा खून केल्याची शक्यता तपासात व्यक्त करण्यात आली आहे. यापूर्वी आंदेकर टोळीने ६ सप्टेंबर रोजी नाना पेठेत गणेश कोमकरचा मुलगा आयुष कोमकर याचा खून केला होता. त्यानंतर आंदेकरसह १६ जणांना अटक झाली होती. सध्या आंदेकर व त्याचे साथीदार न्यायालयीन कोठडीत आहेत.

# राहुल नार्वेकरांची बदनामी झाली असेल, राज्यपालांचा अपमान झाला असेल तर त्यांनी माझ्यावर केस करावी - असीम सरोदे

**पुणे । प्रतिनिधी**

बार काऊन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाकडून विधिज्ञ असीम सरोदे यांची वकिलीची सनद तीन महिन्यांसाठी रद्द करण्यात आली आहे. या निर्णयाबद्दल असीम सरोदे यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेत भूमिका मांडली. गेल्या २५ वर्षांपासून अन्यायग्रस्त लोकांना मी मदत करतो, लोकांसाठी मी विविध विषयात काम केलं आहे. न्याय व्यवस्थेची प्रतिष्ठा वाढली पाहिजे, न्याय व्यवस्थेवर विश्वास वाढला पाहिजे म्हणून मी काम केलं आहे, असं सरोदे म्हणाले. राज्यपाल यांना मी फालतू म्हणालो म्हणून मी मिसकंडक्ट केलं असं म्हटलं आहे. जर मी चुकलो असेल तर सामान्य नागरिकांची मी माफी मागेल, असं असीम सरोदे म्हणाले.

माझ्यावर बालंट लावलं आहे, ज्यांचे आपल्यावर प्रेम आहे ते कुठं चुकलंय ते सांगतात. न्यायव्यवस्थेवर प्रेम असेल, संविधानावर प्रेम असेल. न्यायव्यवस्थेत काही चुका आणि उणिवा असतील तर त्या सांगितल्या तर त्यात चूक काय आहे? कुठली नवी व्याख्या तयार होतेय, असा सवाल असीम सरोदे यांनी केला.



असीम सरोदे पुढं म्हणाले की, मला असा निर्णय होईल असं कधीच अपेक्षा नव्हती. या निर्णयामुळं मला प्रचंड वाईट वाटलं. बार काऊन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाकडून हा निर्णय देण्यात आला. माझ्या विरोधात न वकिली करणाऱ्या राजेश दाभोलकरने तक्रार केली आहे. राजेश सुरेश दाभोलकर भाजपचा कार्यकर्ता आहे. राजेश दाभोलकर यांचे सर्व फोटो भाजप नेत्यांसोबत आहेत. मोदी, आशिष शेलार यांच्यासोबत फोटो आहेत. मी गैरवर्तणूक केली आहे असा शब्द वापरला आहे, असा शब्द वापरला आहे. राजेश दाभोलकर यानं सर्वांना ३८ मिनिटांच्या भाषणाचा पेन ड्राईव्ह दिला होता. उद्धव ठाकरे यांनी जनता न्यायालय हा कार्यक्रम घेतला होता. तेव्हा आमदार अपात्र या विषयावर बोललो होतो. तेव्हा महाराष्ट्राचे राज्यपाल जे होते भगतसिंह कोश्यारी हे फालतू माणूस आहेत पण महत्त्वाच्या पदावर बसलेला असल्यानं आपल्याला तसं बोलता येत नाही, असं म्हटल्याचं मान्य करतो, असं असीम सरोदे म्हणाले. सर्वोच्च न्यायालयानं १० व्या शेड्युलनुसार कोण पात्र, कोण अपात्र याबाबतचा निर्णय घ्या असं राहुल नार्वेकर यांना सांगितलं होतं. सुप्रीम कोर्टाच्या विश्वासाचा विश्वासघात राहुल नार्वेकर यांनी केला हे सुद्धा मी म्हणालो. न्याय व्यवस्थेत न्यायाधीश भ्रष्टाचारी आहेत, असं मी म्हणालो हे चुकीचं आहे, हे चुकीचं आहे कोणीही दाखवून द्यावं, असं आव्हान असीम सरोदे यांनी केलं. मी म्हटलं ते मला मान्य आहे, तुम्ही जो चुकीचा अर्थ काढला तो मान्य नाही असं म्हटलो हे जजमेंटमध्ये आहे, असं असीम सरोदे म्हणाले. फालतू जेव्हा मी बोललो तेव्हा भगतसिंह कोश्यारी राज्यपाल नव्हते. माझी सगळी ४ वाक्य मी म्हणालो आणि हे वाक्य मी पुन्हा पुन्हा म्हणणार कारण हे वास्तव आहे. फालतू हा शब्द असंसदीय शब्द आहे का? शिवी आहे का?, राहुल नार्वेकरांची बदनामी केली असेल तर त्यांनी माझ्यावर केस करावी, असं असीम सरोदे म्हणाले. राज्यपाल यांचा अपमान झाला तर त्यांनी माझ्यावर केस करावी, असंही त्यांनी म्हटलं.

# दिवाळी सुट्टीनंतर आजपासून शाळा पुन्हा सुरू

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सर्व प्राथमिक आणि माध्यमिक शाळा दिवाळी सुट्टीनंतर आजपासून पुन्हा सुरू झाल्या आहेत. संकलित चाचणी परीक्षा संपल्यानंतर १७ ऑक्टोबर २०२५ रोजी शाळांना दिवाळीची सुट्टी लागली होती. या सुट्टीनंतर महापालिकेच्या शाळांमध्ये पुन्हा एकदा उत्साह दिसून आला. सकाळपासूनच शाळांच्या गेटबाहेर विद्यार्थ्यांचा गजबजाट, पालकांची लगबग आणि शिक्षकांच्या चेहऱ्यांवरील आनंद दिसत होता.



आज सुट्टीनंतर शाळा सुरू झाल्यानंतर शाळांमधील वातावरण पुन्हा एकदा आनंद आणि उत्साहाने भरून गेलं. अनेक शाळांमध्ये शिक्षकांनी विद्यार्थ्यांचं स्वागत केलं. शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये गप्पा रंगल्या, सुट्ट्यांमधील अनुभव ऐकवले गेले आणि शिक्षणाचा उत्साह पुन्हा वर्गात उमटला.

दरम्यान, दिवाळीनंतरचा हा काळ विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. पुढील परीक्षा, प्रकल्प आणि शैक्षणिक उपक्रमांसाठी हा काळ तयारीचा आहे. त्यासाठी प्रत्येक शाळेत विशेष मार्गदर्शन सत्रं, प्रकल्प स्पर्धा आणि अभ्यासवर्ग घेण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने स्मार्ट क्लासरूम, ई-लर्निंग साधनं आणि डिजिटल शिक्षणाच्या माध्यमातून शहरातील शाळांना सक्षम बनविण्यावर महापालिका भर देत आहे. अनेक शाळांमध्ये प्रोजेक्टर, संगणक आणि इंटरनेटच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण दिलं जात आहे, अशी माहिती महापालिकेच्या शिक्षण विभागातून देण्यात आली.

cmyk